# UNIVERSITY GRANTS COMMISSION NEW DELHI

## Western Regional Office Pune – 7

### Minor Research Project

# "AHMEDNAGAR MADHIL ADIVASHI LOKANCHE BRITISHANCHYA VIRUDHATIL UTHAO"

# अहमदनगरमधील आदिवासी लोकांचे ब्रिटिशांच्या विरोधातील उठाव

File No. 23-2419/10(WRO), dated : 11 May 2011

**PRINCIPAL INVESTIGATOR**

**DR. AMBADE KISAN MARUTI**

Associated Professor & Research Guide

PG Department of History & Research Center

New Arts Commerce and Science College,

Ahmednagar ( M.S.)Pin 414 001.

**MARCH 2017**

# EXECUTIVE SUMMARY

**प्रास्ताविक :—**

अहमदनगर जिल्हा सर्वांगीण दृष्टीकोनातून महत्वाचा जिल्हा म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो. राष्ट्रिय चळवळीतून देशाचा अस्मिता जोपासण्याची महत्वाची भूमिका अहमदनगर जिल्हयाने बजावलेली आहे. अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक परिस्थिती जर बघितली तर आपणाला विविध जाती—जमातीचे तसेच धर्माचे लोक जिल्हयात असलेले दिसतात. त्यात आदिवासी लोकांची संख्या संगमनेर, अकोला या परिसरात जास्त असलेली दिसून येते. १८१८ ला मराठी सत्तेचा शेवट होऊन याठिकाणी इंग्रजांची सत्ता स्थिर झाल्यानंतर १८०० ते १९०० याकाळात म्हणजेच १९ व्या शतकात आदिवासी भिल्ल, कोळी या जमातीचे ब्रिटिशांच्या विरोधात उठाव केले. १९ व्या शतकात ब्रिटिश सत्तेच्या विरोधात जे आदिवासी लोकांनी उठाव केले आहेत त्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

**१) संशोधनाची आवश्यकता :—**

ब्रिटिशांच्या विरोधात जे उठाव वंचितांनी केले त्या उठावाची दखल आज पर्यंतच्या इतिहास लेखनाने घेतलेली नाही. म्हणून एकत्रितपणे आदिवाशी जमातीने जे उठाव केले ते वर्तमानकालीन समाजाला माहित व्हावे या हेतूने संशोधनाची आवश्यकता भासली म्हणून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**२) संशोधनाचे उद्दिष्टये :—**

१. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आदिवासी जमातीने जे उठाव केले त्याची जाणिव निर्माण करणे.
२. अहमदनगरमधील आदिवासी उठावाची व्यापकता समजूण घेणे.
३. भारतीय स्वातंत्र्याची अस्मिता खालच्या घटकांपर्यंत कशी सजली ते पहाणे.

**३) गृहितके :—**

१. ब्रिटिशांची साम्राज्यवादी प्रवृत्ती

२. समाजातील शोषिकांचे केलेले प्रचंड शोषण.

३. आदिवासीची संघटित भूमिका.

४. एक शतक भर झालेले उठाव पहाणे.

**४) संशोधन पध्दती**

ठतिहास हे सामाजिक शास्त्र असल्यामुळे सामाजिक शास्त्रातील संशोधन पध्दतीचा वापर संशोधकाला आपल्या संशोधनात करावा लागतो. इतिहास हे शास्त्र असल्यामुळे कागद असले तर इतिहास अन्यथा इतिहास नाही. त्यामुळे ऐतिहासिक घटनेचा वेध घेतांना काही पध्दतीचा वापर करावा लागतो. प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक सर्व्हेक्षण आणि वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**५) प्रकरणानुसार मांडणी :—**

१. पहिले प्रकरण संशोधन पध्दतीचे आहे.

२. दसुरे प्रकरणामध्ये अहमदनगरची पार्श्वभूमीची मांडली केलेली आहे.

३. तिसरे प्रकरणात अहमदनगरमधील आदिवासी समाजाचा सामाजिक जीवनाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

४. प्रकरण चारमध्ये १९ व्या शतकाच्या पूर्वाधात आदिवासी लोकांनी ब्रिटिशांच्या विरोधात जे उठाव केले त्याची मांडणी केलेली आहे.

५. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अहमदनगरमधील आदिवासींचे लढे प्रकरण पाच मध्ये करण्यात आलेले आहे.

६. प्रकरण सहामध्ये निष्कर्ष अहे.

अहमदनगर जिल्हयातील मानवी जीवन, पार्श्वभूमी समजणे महत्वाचे आहे. महाराष्ट्रात अनेक राजकीय बदल घडून आले. त्याचा परिणाम आर्थिक व सामाजिक क्षेत्रात झाला. सातवाहन कालखंड, वांकाटक व यादव, बहामणी कालखंड, निजामशाही, आदिलशाही, मराठेशाही, ब्रिटीश राजवट अशा अनेक राजकिय सत्तांनी आपली हुकुमत गाजवली आहे.

आर्यांचे हिंदुस्थनात आगमण होण्यापूर्वी ‘आदिवासी’ हिंदुस्थानात मुळ रहिवासी होते. त्या काळात आदिवासी टोळया–टोळयांनी राहत होते. आर्य हिंदुस्थानात आल्यानंतर आदिवासींच्या बऱ्याच टोळया आर्य लोकांशी समरस झाल्या. काही टोळया पराभूत होवून तर काही टोळया स्वत:ची अस्तित्व टिकवण्यासाठी दऱ्याखोऱ्याच्या व जगंलाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. भारतातील आदिवासींना त्यामुळे ‘गिरीजन’ असे म्हटले जाते. मुळचे ते याच भूमिवरचे असल्यामुळे त्यांना ‘भुमिजन’, ‘भुमित्र’ असे देखिल म्हणतात. नेहमी अरण्यात राहणारे म्हणून ‘अरण्यक’ असेही त्यांना संबोधन्यात येते. भारतीय संविधानाने त्यांना अनुसूचित जमाती म्हणजेच आदिवासी किंवा आदिम जाती संबोधिले जाते.

**भिल्लांचा पूर्व इतिहास :–**

द्रविडी भाषेत ‘विल्लू’ किंवा ‘बिल्लू’ याचा अर्थ धनुष्यबाण असा करतात. भिल्लांच्या हाती नेहमी धनुष्य असे भारतीय जमातीपैकी सर्वात जास्त संख्येची ही जमात. वायव्येकडून पंजाबमध्ये अरब आणि मुस्लिम लोक आले तेव्हा तेथे राहणारे रजपूत दक्षिणेकडे स्थलांतरीत झाले. रजपुतांनी मेवाड, राजस्थान, गुजरातमध्ये राहणाऱ्या आदिवासी जमातींना खाली दक्षिणेकडे पाठविले. त्यामुळे भिल्ल जमात सपाट, सुपीक प्रदेशातून पर्वत रांगात व जंगलाच्या प्रदेशात मोठया संख्येने आली. आजही सातमाळा, अजिंठा, सातपुडा, सहयाद्री, विद्य, अरवली या पर्वतांच्या भिल्ल, हाटकर, बेरड या आदिवासी जमाती बहुसंख्येने आहेत.[२] या आदीवासी जमाती जंगलांच्या आश्रयाने राहुन शिकार, फळे, कंदमुळे खाऊन आपली उपजिविका भागवतात. यांच्यात शिक्षणाचा अभाव जाणवतो. कारण टोळयाटोळयांच्या रूपाने ही जमात विखुरलेली दिसते. कधीकधी ही जमात चोरी लुटमारही करताना दिसून येते.

नंदुरबार जिल्हयातील वसावा, वळवी, पाडवी आणि गावीत, मावची, कोकणी या आदिवासींची मुळ वस्तीस्थाने सातमाळा, सातपुडा, सहयाद्री, अरवली होते. ते काही भिलोरी भाषेतील लोकगीतांवरून स्पष्ट होते.

कोळी ही जमात मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात राज्यांत आढळते. ती काही भागात अनुसुचित जमात म्हणून ओळखली जाते. तर काही भागात या जमातीला मागास वर्गाच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे. कोळयांत सोनकोळी, ढोर कोळी, महादेव कोळी आणि मल्हार कोळी असे वर्ग कोळयांचे पडतात. महाराष्ट्रात यातील दोन वर्ग आढळतात. एक म्हणजे मासे मारणारे कोळी व दुसरे म्हणजे शेती करणारे कोळी. मासे मारणारे सोनकोळी वर्गात मोडतात ते अनुसुचित जमातीत मोडत नाही कारण त्यांची आर्थिक व सांस्कृतिक स्थिती सुधारलेली आहे. अनुसुचित जातीत महादेव कोळी व मल्हार कोळी यांचा मात्र समावेश होतो. ते कोकण व देशात मोठया प्रमाणात आढळतात. डॉ. विल्सन यांनी कोळयांच्या अनेक शाखा दिलेल्या आहेत. त्यात आग्री, अहीर, वंद, भिल्ल, भिलावे, भिरले, चंची, दोर, अगर टोकरे, हेलमार, कब्बेर, कराडे, खार, महादेव, डोंगर ऊर्फ राज, मल्हार, अगा कुनुम, चुमली, पान, भरी, मराठा, माखी, मेंदाले, मेता अगर धनगर, मुसळे, नेहरे, राहताडकर, शिंग, तोकी, तायडे, ठाणकर अगर खिस्ती व वली.[३४]

जव्हारचे राजघराने हे कोळी होते. मल्हार कोळी, महादेव, सोन कोळी व ढोर हे प्रमुख कोळी गट होय. ढोर कोळी सर्वात कनिष्ठ संबोधले जातात.

**महादेव कोळी :—**

महादेव कोळयांची मोठी वस्ती अहमदनगरमध्ये आहे. खंडोबा व एकवीरा देवीची ते भक्ती करत. त्यांची रोग निवारण करणारी वरसुबाई ही ऐक प्रमुख देवता आहे. दसरा, दिवाळी, अक्षय्य तृतीया यांसारखे सण ते साजरे करतात. कोळयांचा नवस व मंत्रतंत्रावर खुप विश्वास असतो.

**मल्हार कोळी :—**

हे खंडोबाचे ( मल्हारीचे भक्त ) असल्यामुळे त्यांना हे नाव पडलेले असावे. हे पाणी भरण्याचे काम करीत असावेत. त्यांना पानभरी कोळी असेही म्हणतात. कारण मल्हार कोळी ठाणे, मुंबई, पंढरपुरच्या परिसरात आढळतात. अहमदनगरमध्येही त्यांची वस्ती आहे. अहमदनगरमध्ये आढळणाऱ्या मल्हार कोळी वर्गातील असंख्य कोळी शेती करतात. मराठेशाहीत ते गड कोटांच्या

संरक्षणाचे कार्य करत असते. त्यामुळे त्यांना गडकरी ही संज्ञा प्राप्त झालेली दिसते. सिंहगड, तोरणा, राजगड या किल्लयांचे वंश परंपरागत रक्षक हे कोळीच होते. मल्हार कोळयांचा बिळे कोडण्याचा ही व्यवसाय होता.[३५]

लग्न कोळी लोकांत विवाह असगोल घराण्यांत होते. याशिवाय विशिष्ठ गोमातच विवाह करण्याची परंपरा कोळी समाजात दिसते. उदा. बांबळे, गोलीयांचे लग्न गोडे, हिले, झांजरे, नाडकर व पिचड यांच्याशी होते तर बाज विवाहाची प्रथा पुर्वीपासून चालत आलेली असली तरी अलिकडे ती प्रौढ विवाह रूपांतरीत झालेली दिसते.

इ.स. १८५७ चा उठाव ही भारतीय इतिहासातील एक अत्यंत महत्वपूर्ण घटना होती. ब्रिटीशांच्या विरोधातील तो एक सशस्त्र लढा होता. या लढयाची सुरूवातीची नांदी जरी भारतीय शिपायांची बंडाळी ही असली तरी त्याची व्याप्ती मात्र केवळ शिपायांच्या बंडापुरतीच सिमित राहू शकली नाही. मुळातच भारतातील विविध गट शेतकरी, कामगार, कारागीर, भिल्ल, कोळी, ठाकर, रामोशी यासारख्या आदिवासी जमाती या ब्रिटीशांच्या विरूध्द असंतुष्ट होत्या आणि या सर्व गटांना आपला असंतोष दर्शविण्याची संधी १८५७ च्या उठावाने मिळालेली होती. ब्रिटीशांच्या विरोधातला हा असंतोष जरी १८५७ च्या उठावात अतिशय प्रभावीपणे मांडला गेलेला असला तरीही तो अचानक उफाळून आलेला नव्हता. या असंतोषाला पूर्वीच्या अनेक वर्षाची पार्श्वभूमी होती. केवळ भिल्लांच्या उठावांपुरते बोलायचे झाले तरी भिल्ल जमातींचेही अनेक वर्षापासून उठाव ब्रिटीशांच्या विरोधात चालूच होते. इ.स. १८५७ च्या उठावासारखी मोठी घटना घडल्यामुळे सहाजिकच भिल्लांच्या लढयांचे १८५७ च्या उठावापूर्वीचे लढे व १८५७ च्या उठावामधील लढे असे दोन भागात विभागणी करणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

१८५७ चा उठाव संपूर्ण भारतात झालेला होता या अनुषंगाने महाराष्ट्रातही कोल्हापूर, रत्नागिरी, अहमदनगर, बेळगाव इत्यादी ठिकाणी उठाव झालेले होते. या उठावाच्या अगोदर इ.स. १८१८ मध्ये महाराष्ट्रात सत्ता होऊन ब्रिटीशांचा एकछत्री अंमल महाराष्ट्रात प्रस्थापित झालेला होता. तेव्हापासूनच

महाराष्ट्रातील वेगवेगळया भागात ब्रिटीशांविरोधी उठाव सुरू झालेले होते. या उठावाची पार्श्वभूमी ब्रिटीशांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक शोषणात होती. शेतीवर अर्थव्यवस्था अवलंबून असलेल्या महाराष्ट्रात शेतीची प्रचंड वाताहत नव्या राजवटीत झालेली होती. निकृष्ट प्रकारची शेती व दुष्काळाचे कायम वास्तव्य यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड वाताहत झालेली होती. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांची ब्रिटीशांकडून चाललेली पिळवणूक थांबत नव्हती. या परिस्थितीमध्ये गावेच्या गावे ओस पडत होती. याचा प्रभाव शहरी जीवनावर पाडणे हेही स्वाभाविक होते. कारण शहरातही धान्य प्रचंड महागले होते. इ.स. १८३२ साली महागाईमुळे पुणे शहरातही दंगा भडकलेला होता. एवढेच नाही तर शेतकऱ्यांना ब्रिटीशांची ‘कायमधारा पध्दत’ प्रचंड जाचक वाटू लागलेली होती. शेतकरी एवढे त्रासलेले होते की, जमिनीची पाहणी करायला जाणाऱ्या अंमलदारावर शेतकरी हल्ले करू लागलेले होते. एकूणच ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ब्रिटीशांनी जे अनेक कर सामान्यांवर लादलेले होते त्यामुळे व्यापार, उद्योगधंदे कारागीर, शेतकरी यांचे खच्चीकरण झालेले होते. यातून ब्रिटीश राजवटी विषयी जनसामान्यांच्या मनात असंतोष निर्माण झालेला होता. या असंतोषाचे पर्यावसन इ.स. १८१८ ते इ.स. १८५७ पर्यंतच्या काळात महाराष्ट्रात ब्रिटीशांच्या विरूध्द अनेक लहान मोठया उठावात झालेले होते.

ब्रिटीशांच्या विरोधात सुरू झालेले हे उठाव विविध आदिवासी जमातींचेही होते. यामध्ये भिल्ल, रामोशी, कोळी व ठाकर या जमाती विशेषत्वाने अग्रस्थानी होत्या. इ.स. १५१५ ते १८३१ या दरम्यान खानदेशातील भिल्लांनी तीव्र स्वरूपाचे लढे दिले. येथील भिल्लांना लढयाचे नेतृत्व त्रिंबकची डेंगळे याने केलेले होते. इ.स. १८२२ मध्ये भिल्लांनी शिरपूर येथेही उठाव केलेला होता. याच दरम्यानच्या काळात पुणे जिल्हयात उमाजी नाईकाने रामोशांना संघटीत करून इंग्रताच्या विरूध्द बंड पुकारले होते. तो स्वत: रामोशांचा म्होरक्या झालेला होता आणि ब्रिटीश अधिकाऱ्यांना त्याने अगदी जेरीस आणलेले होते. ब्रिटीशांनी स्थानिक कारभार, समाजव्यवस्था, धर्म व अर्थकारण

यात हस्तक्षेप सुरू केलेला असल्यामुळे येथील विविध जमातींमध्ये जे असंतोष धुमसत होता त्यातूनच हे उठाव घडत होते.

महाराष्ट्रामध्ये गोंड, भिल्ल, महादेव कोळी या सर्व जमातींनी उठाव केलेले होते. मुळात या सर्व जमाती लढणाऱ्या व राज्यकर्त्या जमाती होत्या. ब्रिटीशांच्या सत्ता स्थापनेमध्ये त्यांची राज्य लयास गेली होती. एकूणच त्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाल्याने ते बंडखोर दरोडेखोर बनणे स्वाभाविक होते. इ.स. १८१८ मध्ये सातपुडयाच्या भागात भिल्ल बंडखोरांच्या ५० टोळया होत्या. या कालखंडात भागुजी नाईक, तंटया भिल्ल, राघोजी भांगरे यांचे बंड गाजलेले होते. इ.स. १८३० च्या सुमाराला भिल्लांच्या टोळयांनी व कोळयांच्या टोळयांनी ठाणे, अहमदनगर, नाशिक, धुळे व पुणे जिल्हयात बऱ्याच ठिकाणी इंग्रजाविरूध्द बंड केलेले होते.[२] ब्रिटीशांनी उत्तर व दक्षिण भारतातील मोठाल्या सत्ता संपुष्टात आणून आपला एकछत्री अंमल संपूर्ण भारतावर प्रस्थापित केलेला होता. हा अंमल संपुष्टात आणण्यासाठी या स्थानिक सत्तांनीही ब्रिटीशांच्या विरोधात बंड सुरू केलेले होते. त्यांच्या या बंडाच्या प्रभाव महाराष्ट्रातील आदिवासी जमातींवरही होते. मुळात आदिवासी जमाती या सहनशील जमाती होत्या. तथापी स्वत:वर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात मात्र या जमातींनी कटाक्षाने उभा राहण्यास सुरूवात केली होती आणि त्यात भिल्लही मागे नव्हते. आदिवासी जमातींनी ब्रिटिशांच्या विरोधात उठाव का केले.

**आदिवासी जमातींनी ब्रिटीशांच्या विरोधात केलेल्या उठावांची कारण मिमांसा :**

इतिहासातील कोणतीही घटना निश्चित अशा कारण मिमांसेशिवाय घडलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रात विविध आदिवासी जमातींनी ब्रिटीशांच्या विरोधात जी बंड केले. त्यापाठीमागेही निश्चित अशी कारण मिमांसा होती. आठराव्या शतकापासून ब्रिटीशांनी डोंगर दऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींना विविध प्रकारांनी त्रास देण्यास सुरूवात केलेली होती. याचे पर्यावसन त्यांच्या असंतोषामध्ये झालेले होते.

तत्कालीन कालखंडातील सावकार, व्यापारी, कंत्राटदार यांनी आदिवासी प्रांतात घुसुन तेथील मुळच्या रहिवाशांना लुटण्यास सुरूवात केलेली होती.

वास्तविक या लुटीसाठी या लोकांना ब्रिटीशांची फूस होती. त्यामुळे या जमातींमधील असंतोष अधिक वाढत चाललेला होता. या उठावांमध्ये भिल्लांनी इ.स. १८१८ ते १८४८ च्या दरम्यान खानदेशमध्ये, होस जमातींनी १८३२ मध्ये छोटा नागपूर येथे, खासी जमातींनी १८२९ ते १८३२ दरम्यान असाम येथे, कोया व संथाळांनी इ.स. १८५५ ते १८५६ मध्ये आंध्रप्रदेश येथे तर मुंडा जमातींनी १८९९ ते १९०० च्या दरम्यान छोटा नागपूर येथे इत्यादी उठावांचा उल्लेख करावा लागतो.[३]

आदिवासी संस्कृतीला भारतीय संस्कृतीच्या उत्थानाची गंगोत्री मानले जाते. या आदिवासींना स्वत:च्या वेगळया रूढी, परंपरा, चालीरीती होत्या. त्यामुळे त्यांची एक स्वत:चीच स्वतंत्र अशी संस्कृती होती. ब्रिटीशांनी आदिवासी जमातींच्या भूभागावर हस्तक्षेप केला तसाच तो त्यांच्या परंपरा रीतीरिवाज यांच्या बाबतीतही केलेला होता. ब्रिटीशांनी या परंपरांमध्ये केलेली ढवळाढवळ या लोकांना अमान्य होती. या आदिवासींच्या काही प्रथा या विघातक असल्या तरीही त्यांना त्या अतिशय प्रिय होत्या. त्यामुळे जेव्हा काही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी बालहत्या, मनुष्यबळी, अशा अमानवी प्रथांवर बंदी घातली तेव्हा आदिवासी लोकांना हे आपल्यावरील सांस्कृतिक आक्रमण वाटलेले होते.[४] यातून संस्कृति रक्षणासाठी या जमातींनी ब्रिटीशांच्या विरूध्द बंड सुरू केले असे अधोरेखित होते.

ब्रिटीशांनी कोणतेही कारण न सांगता आदिवासींच्या डोंगर दऱ्यांच्या भागात, शेतीमध्ये अतिक्रमण करण्यास सुरूवात केलेली होती. आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी त्यांनी आदिवासींचे प्रांत काबीज केले होते. आदिवासींना हे अतिक्रमण व हस्तक्षेप सहन न झाल्याने त्यांनी उठाव सुरू केले त्यामध्य चौर १७६८; भिल्ल १८१८ ते १८४८; होस १८२० ते १८२२; खासी १८२९ ते १८३२; सिंगफो १८३० इत्यादी उठावांचा समावेश होता.[५]

डोंगरदऱ्यातील असलेल्या खेडयांचा राज्य कारभार करणे सोपे जावे या अनुषंगाने ब्रिटीशांनी आदिवासींमधील स्थानिक लोकांची पोलीस शिपाई म्हणून नियुक्ती केलेली होती. आदिवासी हे अंगा पिंडानी धिप्पाड होते व काटक

असल्याने त्याचा एक प्रकारचा दबदबा स्थानिक खेडयांवर असायचा. या पोलीस जमादारांना ब्रिटीश पगार द्यायचे. त्याच बरोबर स्थानिक खेडयातून महत्वाचा व्यक्ती म्हणून लोकांकडून वार्षिक भेट त्यांना मिळायची तथापी ब्रिटीशांनी कायद्याने अशा भेटी घेण्यावर बंदी आणली होती. त्यामुळे या जमादार लोकांनी ब्रिटीशांचा विरूध्द उठाव सुरू केले. रामजी भांगरे याने केलेला उठाव याच कारणाने झालेला होता. — "Ramaji Bhangre who in his youth had been a famous outlaw and during the latter years of Bajirao's region had become a most useful police officer on the establishment of British rule, waited on the Collector and was appointed chief constable or Jamadar of one of the hill Police posts. According to custom in addition to his pay, Ramji received as a yearly meeting or 'bhet' – present from every village a rupee, a fowl, and some rice, and a sheep from ever flock that passed through his charge…… Ramji did good service until an order came that no Government servent was to take any present in addition to hip pay. This order was applied to Ramji and his chickens; he wrote to ask that an exception might be made his favour; and as he got no answer to his letter he asked for his discharge. His discharge was refused and he was given six months' leave. At the end of the Six months' leave as nothing was done to raise his salary, or to make up for his loss of perquisites he went into outlary"[6] यावरून स्पष्ट लक्षात येते की, ब्रिटीशांनी स्थानिक जमादारांना जी वर्षासने मिळायची त्यावर बंदी घातली होती. त्यामुळे या जमादारांना आपल्या नोकरीत सारस्य ठरले नाही. रामजी भांगरे याने ब्रिटीशांनी आपल्याला या कायद्यातून वगळावे अशी विनंती केलेली होती परंतु ती ब्रिटीशांनी नाकारली व त्यामुळे त्याने नोकरी सोडण्याचा विचार केला. ब्रिटिशांची केवळ सहा महिन्यांची रजा मंजूर केली व त्यामुळे त्याने ब्रिटिशांच्या विरोधात बंड पुकारले.

ब्रिटीशांनी आपल्या महसूलात वाढ व्हावी या कारणास्तव देखील जंगली भागावर वर्चस्व प्रस्थापित केलेले होते. त्यांनी तेथील रहिवाश्यांवर प्रचंड जुलमी कर लादलेले होते. लाकूड विक्रीसाठी प्रचंड प्रमाणात वनांची तोड केलेली होती. जंगली उत्पादनावर आपली मालकी हक्क सांगण्यास सुरूवात केलेली होती. त्यामुळे आदिवासी उठाव करण्यास प्रवृत्त झालेले होते. या शिवाय या

आदिवासींच्या गरीबीचा व त्यांच्या दारिद्रयांचा फायदाही ब्रिटीश घेत होते. ब्रिटीश लोक त्यांच्याकडून अगदी हलक्या दर्जाची कामे करून घेत होते. त्यांच्याकडून अगदी गुरांप्रमाणे व अशिक्षित असल्याने त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्यांना सुरूवातीला झाली नसली तरीही नंतर मात्र त्यांच्यात ब्रिटीशांविरूध्द असंतोष निर्माण होण्यास सुरूवात झाली. सुरूवातीला निमूटपणे ही गुलामगीरी सहन करणारे आदिवासी शेवटी बंडाने पेटून उठले.

आदिवासींच्या या उठावामध्ये धार्मिक कारणही तेवढेच महत्वाचे होते असे म्हणावे लागेल. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी या आदिवासी भागात प्रवेश करून त्यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारावा यासाठी ते विविध मार्गाने प्रयत्न करीत होते. धर्मांतर ही बाब इतर भागांतील लोकांप्रमाणे आदिवासींनाही अमान्य होती.

एकूणच ब्रिटीशांनी आदिवासी समाजांवर चालविलेला अन्याय, अत्याचार, सामाजिक रूढींवर होणारी अतिक्रमण गुलामगिरी अशा अनेक कारणांनी या आदिवासींनी ब्रिटीशांच्या विरूध्द उठाव केले.

**१९ व्या शतकाच्या पूर्वाधातील भिल्लांचे उठाव –**

इ.स. १८५७ च्या बंडामध्ये संस्थानिक, शिपायांबरोबरच आदिवासी समजल्या जाणाऱ्या अनेक जमातींनी उठाव केले. ब्रिटीश सरकारच्या अन्यायी आणि जुलमी धोरणांविरूध्द देशातील विविध भागातून प्रतिक्रिया उमटण्यास सुरूवात झालेली होती. भारतीय जनतेमधील ब्रिटीशांच्या विरोधात जो अंसतोष होतो तो इ.स. १८५७ च्या उठावातून दिसून आला. एकूणच भारतीय असंतोषाची प्रतिक्रिया उठावातून उमटलेली होती. तथापी हा सगळा असंतोष अचानक उफाळून आला असे मात्र नव्हते. इ.स. १८५७ च्या उठावापूर्वीही छोट मोठे बंड विद्रोह चालूच होते आणि ते आदिवासी जमातींमध्येही झालेले होते. किंबहुना ज्या काळात शिपाई आणि संस्थानिक ब्रिटीशांबरोबर एकनिष्ठ होते. त्याच काळात ब्रिटीशांच्या विरोधात ठामपणे उभ्या राहिल्या त्या आदिवासी जमाती होत्या.

इ.स. १८५७ च्या उठावापूर्वी अहमदनगर मधील भिल्लांच्या उठावाला सुरूवात ही संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी येथून झााली. येथील

त्रिंबकजी डेंगळा हा पेशव्यांचा धाडसी आणि एकनिष्ठ सेवक होता. परंतु त्यास ब्रिटीश सरकारने गंगाधरशास्त्री यांच्या खूनाच्या गुन्हयात पकडून कैदेत ठेवले होते. या दरम्यान पेशव्यांनी इंग्रजाबरोबर तैनाती फौजेचा करार केलेला असल्याने तो इंग्रजांच्या विरोधात जाऊ शकत नव्हता. त्रिंबकजीने कैदेत असतांना मोठया शिताफीने स्वत:ची सुटका करून घेतली व इंग्रजांच्या विरोधात बंडाचे रणशिंग फुंकले. त्याने प्रथम खानदेश, बागलान, या भागातील भिल्ल व रामोशी लोकांनी संघटीत केले व त्यानंतर अहमदनगर जिल्हयातील अकोले व संगमनेर तालुक्यात येऊन तेथील भिल्ल व कोळयांना संघटीत करून इंग्रजांच्या विरोधात चिथावले. त्रिंबकजीच्या या सर्व कारवाईमध्ये त्यास पेशव्यांचीही आर्थिक मदत होती. ही बाब ब्रिटीशांना समजली होती. तैनाती फौजेच्या कराराने पेशवे उघडपणे त्रिंबकजीला मदत करू शकत नसले तरीही त्यांची छुपी मदत त्रिंबकजीला होती ही बाब ब्रिटीशांच्या लक्षात येताच ब्रिटीशांनी एक पत्र पेशव्यांना पाठविले होते व त्यात लिहिले होते की, एक महिन्याच्या आत त्रिबंकजीला आमच्या स्वाधीन करा तोपर्यंत जामीन म्हणून २४ तासाच्या आत तुमचे चार किल्ले रायगड, पुरंदर, त्रिंबक व सिंहगड आमच्या ताब्यात द्या. पेशव्यांनी चार किल्ले ब्रिटिशांच्या स्वाधीन केले मात्र त्रिंबकजीला पकडण्याची उपाययोजना केली नाही.[७] यावरून स्पष्ट दिसून येते की, पेशव्यांचाही त्रिंबकजीच्या बंडाला पूर्ण पाठींबा होता. अर्थात ब्रिटिशांपासून मराठेशाही खालसा होऊ नये यासाठीचा एक आर्त प्रयत्न बाजीराव पेशव्याचा यापाठीमागे समजावा लागेल.

त्रिबंकजी डेंगळाने विविध भागात राहून इंग्रजांना त्रास देणे चालूच ठेवले. विशेषत्वाने त्याने बागलाण, खानदेश, अकोले, संगमनेर या भागातील कोळी, भिल्ल व रामोशी या आदिवासी लोकांना हाताशी धरून त्याने इंग्रजांविरूध्द बंड उभारलेले होते. त्याने स्थानिक लोकांच्या मनात ब्रिटिशांच्या विरोधात तेढ निर्माण व्हावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेले होते. त्याने ब्रिटीशांचे किल्ले लुटलेले होते. त्याच बरोबर ज्या आदिवासींच्या वतनदाऱ्या नष्ट झालेल्या होत्या त्यांना त्याने ब्रिटीशांच्या विरोधात संघटीत केलेले होते.

त्रिंबकजीचे बंड ब्रिटिशांकरीता त्रासदायक ठरत होते. त्याचे बंड मोडण्याकरिता जनरल डोव्हटन या ब्रिटीश अधिकाऱ्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली होती. या अनुषंगाने जनरल डोव्हटन हा सैन्यानिशी अहमदनगरमध्ये दाखल झाला. त्याने त्रिंबकजी डोंगळावर हल्ला केला परंतु तो त्याच्या हातातून निसटला. ब्रिटीशांनी बंडवाल्यांचा म्होरक्या पकडण्यासाठी ब्रिटीश अधिकारी बक्षिसांचे आमिष प्रजेला दाखवित असत. यानुसार इंग्रजांनी त्रिंबकजीला पकडुन देणारास बक्षिस दिले जाईल असा जाहिरनामा काढला व नाशिक भागातील वणी दिंडोरी जवळ आहेरवाड येथे त्रिंबकजीला ब्रिटिशांनी पकडले मात्र ब्रिटिशांना त्रिंबक डेंगळेला मृत्यूदंडाचीच शिक्ष द्यायची होती परंतु त्यामुळे लोकांमधील असंतोष आणखी वाढेल या भितीने ब्रिटिशांनी केवळ त्यास चुनारच्या किल्ल्यात कैदेत ठेवले व शेवटी इ.स. १८२९ मध्ये त्याचा तेथेच मृत्यू झाला.[८] एकूणच त्रिंबकजीच्या उदाहरणावरून लक्षात येईल की, आदिवासींच्या उठावाच्या बाबतीत अहमदनगरमधील पहिले बंड त्रिंबकजी डेंगळेच्या माध्यमातून झाले होते. वास्तविक त्रिंबकजी हा मराठयांचा विश्वासू सेवक होता. मराठयांची सत्ता दिर्घकाल टिकावी यासी त्याचे प्रयत्न असायचे. परंतु ब्रिटिशांनी इ.स. १८१८ ला मराठेशाही खालसा केली. यानंतर जे मोठे सरदार होते ते आपआपल्या मुलुखावर स्थायिक झालेत्र या प्रवाहात लहान मोठे किल्लेदार यांची परिस्थिती बिकट बनली होतीत्र अशा परिस्थितीत पेशवाईची व मराठी राज्याशी जो प्रमाणिकपणे वागला तो अहमदनगर जिल्हयातील त्रिंबकजी डेंगळा मात्र दुदैवी ठरला व त्याला आपले जीवन मातीमोल घालावे लागले.[९] एकूण असे स्पष्ट होते की, त्रिंबकजी डेंगळा यास मराठयांशी एकनिष्ठ राहून ब्रिटिशांशी संघर्ष करणे भाग पडले.

मराठेशाहीच्या पाडावानंतर मराठा सरदारांच्या ताब्यात असलेला एकएक प्रांत ब्रिटिशांनी आपल्या वर्चस्वाखाली आणण्यास सुरू केलेली होते. अगदी अहमदनगर प्रांताचा विचार केला तर त्यावेळी अहमदनगर शिंदे व होळकर यांच्या ताब्यात होते. त्यावेळी इंग्रजांनी शिंदे व होळकरांशी संघर्ष करून अहमदनगर प्रांत आपल्या वर्चस्वाखाली आणलेला होता. मराठयांच्या काळात

अहमदनगर प्रातांत येणारे जेवढे गड व किल्ले होते त्यावर वतनदार म्हणून भिल्ल व कोळी यांना रखवालीचे काम सोपविण्यात आलेले होते. विशेषत: अकोले, संगमनेर, नाशिक, जुन्नर भागातील वतनदारांवर बेकारीचे सावट निर्माण झालेले होते. त्यामुळे हे बेकार होणारे वतनदार यांनी बंडाचा पवित्रा घेतलेला होता. अहमदनगर जिल्हयातील शेवगाव भागातील पूर्वीचा सुभेदार धरमजी प्रतापराव हा होता. शेवगाव ब्रिटिशांच्या ताब्यात जाताच धरमजी प्रतापराव याने इग्रंजांविरूध्द उठाव सुरू केला होता. त्याचे बंड मोडण्याचा ब्रिटिशांनी प्रयत्न केला होता. यासाठी कॅ. पॉटिंजर, मॉकलीन व स्मिथ यांच्यावर बंड मोडीत काढण्याची जबाबदारी सोपविलेली होती. या अधिकाऱ्यांनी त्याचे बंड मोडीत काढण्यासाठी त्यांनी संघटीत केलेल्या काही लोकांना आर्थिक आमिष दाखवून बाजूला केले तर काहींना अहमदनगरच्या किल्ल्यात कैद केले. अशाप्रकारे धरमजी प्रतापरावचे बंड ब्रिटिशांनी मोडीत काढले होते. कैदेत ठेवलेल्या सैन्याची प्रचंड वाताहत त्यांनी केलेली होती. तेथील होणारी उपासमार अन्याय व छळ यामुळे कैद्यांनी तुरूंगातही बंड केले होते. तेथील पहारेकऱ्यांची हत्यारे हिसकावून घेऊन त्यांना मारहाण केली होती.[१०] या कैद्यांचे बंड मोडण्यासाठी पॉटिंगजर याने तेथे सैन्य पाठविले व त्यांच्यावर बेछुट गोळीबार केला अशा प्रकारे कैद्यांचे बंड देखील ब्रिटिशांनी मोडून काढले होते.

अहमदनगरच्या किल्लयातील कैद्यांवर गोळीबार केल्याची बातमी इतरत्र पसरल्यामुळे या घटनेचे तिव्र पडसाद पसरणे स्वाभाविक होते. या गोळीबारात सुमारे ८० बंडवाले ठार झालेले होते. त्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात इतर भिल्ल व कोळी लोकांमध्ये प्रचंड असंतोष पसरलेला होता. याचाच परिणाम म्हणून इ. स. १८२२ मध्ये बेलापूर, सोनई, ब्राम्हणी या भागातील धाडसी व शूर भिल्लांनी संघटीत होऊन इंग्रजांविरूध्द बंड पुकारलेले होते. संघटीत होऊन ब्रिटिशांना कोंडीत पकडायचे असा कट बंडवाल्यांनी रचलेला होता. व यासाठी उत्तर हिंदुस्थानातील काही इतर बंडवाल्यांचीही मदत मिळावी अशी योजना त्यांनी आखलेली होती. या अनुषंगाने कटाची बातमी महाराष्ट्रातील इतर बंडवाल्यांना पोहचविली गेली व सर्व कटवाल्यांनी गुप्तपणे लासून येथे जमावे

व उत्तर हिंदुस्थानातून बंडवाल्यांची मदत मिळताच ब्रिटिशांवर हल्ले करावेत अशी एकूण योजना आखण्यात आलेली होती. या कटामध्ये भिल्ल बहुसंखेने सहभागी होते. परंतु या कटाचा सुगावा ब्रिटिशांना अगोदरच लागला व ब्रिटिशांनी  का कट अयशस्वी केला.[११] एकूणच या बंडामध्ये भिल्लाना अपायशच आले असेच म्हणावे लागेल. मुळात अपयश येण्याचे कारणही आपआपसातील मतभेद व ऐनवेळी ब्रिटिशांबरोबर केली जाणारी फितुरी हेच होते.

भिल्लांच्या उठावाच्या बाबतीत अभ्यास करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे ब्रिटीश बंडवाल्या टोळयांचे उठाव मोडीत काढीत होते तरीही त्या अपयशातून बंडवाल्यांच्या आणखी टोळया संघटीत होऊन पुन्हा ब्रिटिशांच्या विरोधात उभ्या ठाकत होत्या. याला कारण ब्रिटिशांनी कुट निती होती. पेशवाईनंतर ब्रिटीश सरकार श्रीमंत, जमीनदार, प्रतिष्ठित लोकांचा सन्मान ठेवत होते व जे छोटे कमकुवत आहेत त्यांचा अपमान करीत होते. आदिवासी जमाती म्हणून ब्रिटिशांनी त्यांना नेहमीच झिडकारले होते. शिवाय विविध भागात जे आदिवासी किल्लेदार सरदा नाईक म्हणून काम पाहत होते तसेच काही भागात वतनदार म्हणून काम पहात होते त्यांना ब्रिटिशांनी नेहमीच पदावरून दूर केलेले होते. या असंतोषाची परिणीती नेहमीच बंडात झालेली होती.

याच दरम्यानच्या काळात इ.स. १८४१ मध्ये अहमदनगर भागात भिल्ल बंडखोर तुकडीने पिंपळनेर व साक्री येथे सरकारी खजीना लुटला होता. याच वेळी भीमा नाईक याने सुलतानपुरावर हल्ला करून इंग्रजांना हैराण केलेले होते. इ.स. १८४२ ते ५१ दरम्यानच्या काळात भिकाऱ्या नाईक, भागचंद नाईक, कुंवर जीवा यासारख्या भिल्लांनी इंग्रजांना खूप त्रास दिलेला होता. असे असले तरीही ब्रिटीश त्यांचे बंड मोडण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होते. दि. ४ ऑक्टोंबर १८५७ रोजी ले. हेन्रीच्या नेतृत्वाखाली अहमदनगरच्या पोलिस तुकडीने भिल्लांवर हत्ता केला. याच दरम्यान संगमनेर जवळील चंदनापुरीच्या टेकडीवर हेन्रीच्या मृत्यू झाला होता. यावेळी बंडवाल्यांचा म्होरक्या भागोजी नाईक हा खानदेशातील महादेवाच्या डोंगरी भागात वास्तव्य करीत होता. कर्नल

थॅचर व मॅकन हयांनी त्याला डोंगरामध्ये पळावयास लावले होते. भिल्लांनी पाळणशेर हे खेडे लुटले होते व या परीसरातील टेलीफोनच्या तारा तोडून इतर गावांवरही हल्ले चढविले होते. भिमा नाईकाने ८०० भिल्लांच्या नेतृत्वाखाली दि. १२ ऑक्टोबर १८५७ रोजी सर्व वाहतुक बंद पाडली व ब्रिटिश सरकारवर संकट ओढवून आणले होते. इ.स. १८५७ च्या शेवटी सिन्नर येथे भिल्लांनी लुटमार दरोडे मोठया स्वरूपात केलेले होते.[१२] याच दरम्यान भिल्लांनी बाजारात विक्रीसाठी आलेले धान्य इतर वस्तू तसेच व्यापाऱ्यांकडील रोख रक्कम दरोडे टाकून हस्तगत केल्याच्या घटनाही घडलेल्या होत्या.

या दरम्यान काळातील भिल्ल बंडवाल्यांचे स्फुर्तीस्थान भागोजी नाईक याने शंभर भिल्लांची तुकडी उभारली होती. याच सुमारास भिमा नाईक, खाज्या नाईक, हयांच्या तुकडीने नोव्हेंबर १८५७ मध्ये कलेक्टर मुक्कामी असलेल्या इंदौर वरून खजीना व आफूची लूट केली होती. यावरून असे स्पष्ट दिसते की, जेवढा जुलुम ब्रिटिश आदिवासींवर करत होते. तेवढेच भिल्ल चिथावले जात होते व ब्रिटिशाच्या विरोधात संघटीत होत होते.

ब्रिटिशांनी केलेल्या अत्याचाराचा केवळ स्थानिक भागातच प्रभाव पडत होता असे नाही तर इतर प्रांतातील घटनेचा प्रभावही बंडासाठी तेवढाच प्रेरणादाई ठरत होता. खानदेशातील आदिवासींच्या विरोधात ड्रम ट्रायल नावाचा खटला ब्रिटिशांनी चालविलेला होता. व त्यानुसार ५७ लोकांना गोळी घालून ठार केले होते. ही बातमी अहमदनगरच्या भिल्लांना समजताच त्याचा बदला घेण्यासाठी नांदगाव येथे भिल्लांनी एकत्र जमायचे ठरविले होते. एकूण चारशेच्या सुमारास भिल्लांची संख्या होती व त्यांनी ब्रिटिशांवर हल्ले चढविले होते. हा हल्ला परतवून लावण्यासाठी ले. स्टुअर्ट कॅ. माऊंट गेमेरी व लेत्र चेंबर्लन या अधिकाऱ्यांसहीत तीनशे सैंन्याची फौज आलेली होती. या चकमकीमध्ये कॅ. माऊंट गोमेरी ले. चेंबर्लेंन जखमी झालेले होते तर ले. स्टुअर्ट मृत्यूमुखी पडलेले होते.[१३] यावेळी इंग्रजांकडील जवळजवळ १९ लोक मृत्यूमुखी पडले होते व ५० जखमी झालेले होते. तसेच भिल्लांकडील २५ लोक मृत्युमुखी पडलेले होते.

याच दरम्यान अहमदनगरमध्ये अकोला, संगमनेर, राहुरी, पारनेर या भागातील भिल्लांनी भागोजी नाईकांच्या नेतृत्वाखाली उठाव सुरू केले होते. भागोजी नाईक हा पोलिस खात्यात जमादार म्हणून नोकरीस होता. त्याने इ.स. १८५५ मध्ये बंडखोरांना अप्रत्यक्ष मदत केली होती म्हणून त्यास शिक्षा झालेली होती. त्याने इ.स. १८५५ मध्ये बंडखोरांना अप्रत्यक्ष मदत केली होती म्हणून त्यास शिक्षा झालेली होती. या भिल्लांशी ब्रिटिश सरकार विरूध्द उठाव केलेले होते. भारताच्या अनेक आदिवासी भागातही उठाव झालेले होते. त्यामध्ये दक्षिण नाशिक व उत्तर अहमदनगर या भागात राहणाऱ्या दोन डोंगरी जमाती कोळ ीव भिल्ल यांचे उठाव महत्वपूर्ण ठरलेले होते. त्यांनी स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरूध्द संघर्ष केलेले होते.[१४]

पेशवाई ज्यावेळी ब्रिटिशांनी जिंकली त्यावेळी अहमदनगर शिंदयाच्या वर्चस्वाखाली होता. वेलस्लीने अहमदनगरचा प्रदेश ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आणला होता. अहमदनगर जिल्हयाचा भाग ब्रिटिशांच्या ताब्यात ज्यावेळी आला त्यावेळी अकोले, संगमनेर, नाशिक, जुन्नर या भागातील जवळजवळ ३० किल्ल्यावर व गडावर लहान लहान वतनदार म्हणून भिल्ल व कोळी हे आदिवासी लोक रखवालीची कामे करत होते. आपल्या वतनदारीवर हल्ला होताच या लोकांनी वतनदारी करता ब्रिटिशांनी जिकंलेल्या भागात बंडाळी सुरू केली होती.

ब्रिटिश सरकारने अहमदनगरमधील कोळी नाईकांच्या वतनदारी नष्ट केलेल्या होत्या. त्या कोही नाईकांचा प्रमुख रामजी भांगरे हा होता. त्याला ब्रिटिश सरकारने सहयाद्रीच्या भागात जमादार म्हणून नेमले होते. त्याला पगारशिवाय प्रत्येक खेडयातून एक रूपया एक कोंबडी आणि काही तांदूळ मिळण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे कोणत्याही सरकारी नोकराने आपल्या पगाराशिवाय कोणतीही भेट व नजराणा घेऊ नये असा हुकुम सरकारचा होता. हा कायदा रामजी भांगरे यालाही लागू होता. या हुकूमाची अंमलबजावणी आपल्यावर होऊ नये असे त्याचे म्हणणे होते. तशा स्वरूपाचे पत्र त्याने आपल्या अधिकाऱ्याला पाठविले होते. पण या पत्राचे उत्तर त्याला

आले नाही त्यामुळे चिडून जाऊन त्याने आपल्याला सेवेतून मुक्त करावे अशी मागणी केली होती. सरकारने त्याला नोकरीतून मुक्त न करता सहा महिन्याची रजा दिली. सहा महिन्यानंतर त्याने आपल्या पगाराची मागणी केली. त्याच्या पगाराचा मात्र विचार झाला नाही. या गोष्टीमुळे तो अधिकच चिडला होता. त्यामुळे त्याने रतनगडाच्या भिल्ल किल्लेदाराच्या प्रोत्साहानाने ब्रिटिश सरकारविरूध्द बंड केले होते.[१५]

रतनगडाचा किल्लेदार गोविंदराव खाडे याने मराठेशाही अस्तानंतर इंग्रजाच्या नोकरीत रहाणे नाकारले. त्यामुळे ब्रिटिशानी त्याकडून किल्ला खाली करून घेतला व किल्ल्याच्या बाजूला जे किल्ल्याचे संरक्षण करीत होते. त्या लोकांनाही ब्रिटिशांनी कामावरून काढून टाकले होते. गोविंदराव खाडे याचे वंशपरागत चालत आलेले किल्लेदाराचे वतन काढून घेतल्यामुळे त्याने इ.स. १८२८ मध्ये ब्रिटिशाविरूध्द बंड केले होते. त्याला यावेळी शिबंदीतून कमी होऊन बेकार झालेल्या लोकांनी मदत केली होती. तसेच रामजी भांगरे हा कोकणात राहून त्याला मदत करीत होता. गोविंदराव खाडे याने आपल्या ताब्यातून गेलेला किल्ला परत मिळण्याचा व बेकार झालेल्या लोकांच्या व्यवस्थेकरिता लुटमार करण्याला आपल्या लोकांना परवानगी दिली होती. त्यामुळे या बंडखोर लोकांकडून आपणास त्रास होत आहे. अशा तक्रारी आसपासच्या भागातून इंग्रज सरकारकडे येऊ लागल्या होत्या. तेव्हा त्यांचा बंदोबस्त करण्याकरिता कॅप्टन मॉकिन्टॉश याला सैन्यासह गोविंदराव खाडे यांच्यावर पाठविण्यात आले होते. या बंडात गावातील किती लोक सहभागी झाले आहेत याचा अंदाज कॅप्टन मॉकिन्टॉश याला लागला नाही. तसेच नेमकी कोठे हल्ला करावा हे त्याला समजत नव्हते. बंडखोराचा बंदोबस्त करण्याला गेल्यावर हे लोक त्याच्या विरूध्द उठाव करीत असत. यामुळे तो अगदी त्रासून गेलेला होता. शेवटी त्याला असे समजले कि या उठावाला काही कुलकर्णी कारणीभूत आहेत. नंतर त्याने काही कुलकर्णी लोकांना विश्वासात घेऊन विचारपूस करताच त्यांनी मॉकिन्टॉश याला असा सल्ला दिला की त्याने

बंडखोराचे काय म्हणणे आहे ते ऐकून घ्यावेत. म्हणजे त्यांच्याविरूध्द सैन्य पाठविण्याचे काहीच कारण पडणार नाही.

मॉकिन्टॉश स्वत: सहयाद्रीच्या घाटावरील अवघड ठिकाणे दऱ्या खिंड घाट व रस्ते यांची माहिती आपल्या सैन्याला देत होता. त्याचबरोबर या बंडवाल्याचे प्रमुख कोण आहेत. त्यांना कोणाचा पाठिंबा आहे का? त्यांच्या लपण्याच्या जागा एकत्र कोठे आहेत, ते सर्व कोठे जमतात व त्यांचे ठिकाणे कोठे व ते किती आहे, या गोष्टीची माहिती त्याने मिळविली होती. या सर्व माहितीसह त्याने एक पलटन आपल्या मदतीला मागवून घेतली व तुकडीला बारीच्या घाटात आणून ठेवले होते. तसेच मालेगाव, पुणे, अहमदनगर या भागाकडे जाणाऱ्या आणि त्या भागातून अकोले, संगमनेर या भागाकडे येणाऱ्या मोक्याच्या जागा रोखून ठेवल्यानंतर हत्यारबंद राहून कोळी लोकांच्या लपण्याच्या जागा आणि त्यांना कोण मदत करत आहे हे शोधण्याचा प्रयत्न केलेला होता.[१६] कॅप्टन मॉकिन्टॉशने केलेलल्या बंदोबस्ताला प्रत्युत्तर देण्याकरिता आणि त्याला मदत करणारी गावे कोळी बंडवाल्यांनी लुटली होती आणि ते टोळया करून राहू लागले होते. त्यांच्या असे लक्षात आले की, इंग्रज सैनिकांनी सर्व रस्ते आणि पाणी पिण्याची ठिकाणे आडवली आहेत. अशा प्रकारे बंडवाल्यानी कोंडी सर्व बाजूने झाल्यामुळे त्यांचा नाईलाज झाला होता. त्याना अन्नही मिळणे कठिण झाले होते. त्यांची सर्व प्रकारची मदतही बंद झालेली होती. गावकरी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या जबरदस्तीमुळे बंडवाल्यांशी फटकून वागू लागले होते. सर्व बाजूने बंदोबस्त करून ब्रिटिशांनी सैनिक बंडवाल्यांना पाठलाग करत होते. ब्रिटिश सैनिकांविषयी माहिती मिळताच बंडवाले डोंगर पठारावर पळून जात असत. प्रत्यक्ष सामना करण्यासाठी आणि आपले सामर्थ्य कमी असल्यामुळे सैनिकांना हत्यारबंदी असल्यामुळे विनाकारण प्राणास मुकावे लागणार होते. ब्रिटिशापुढे आपला निभाव लागणार हे बंडवाले ओळखत होते. अन्नपाण्यावाचून व्याकूळ स्थितीत असताना बंडवाल्यातील ८० लोकांना ब्रिटिशांनी पकडले व या लोकांना पकडून अहमदनगरच्या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवण्यात आले होते. बंडाचा शेवट झाल्याची खात्री ब्रिटिश

अधिकाऱ्यांना खुद्द कॅप्टन मॉकिन्टॉश याला वाटत होते. पण बंडाचा सर्वस्वी मोडलेले नव्हते घडलेल्या घटनेमुळे बंडवाल्यांनी तसा भास निर्माण केला होता.[१७]

ब्रिटिशांनी काही बंडवाल्यांना पकडून अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले आहे, ही बातमी बंडवाल्यांतील रामा किरवा नावाच्या बंडखोराला कळताच त्याने ब्रिटिशांविरूध्द उठाव केला होता. तो ओतूरच्या भागात पळून जाता त्याचा पाठलाग करण्याकरिता कॅप्टन लुकीन लेफ्टनंट लाईट लेफ्टनंट फौर्वीस या प्रमुखामार्फत तीन पलटणी पाठविण्यात आल्या होत्या. त्यांनी रामा किरवा याला चारही बाजूनी घेरले व असहाय्य स्थितीत पकडले व त्याच्याबरोबरच्या लोकांना पकडून अहमदनगर, ठाणे व पुणे येथील तुरूंगात ठेवण्यात आले होते. इ.स. १८३० मध्ये इतर बंडवाल्यांना दहशत बसावी म्हणून रामा किरवा याला खुनी बंडखोर ठरवून त्याला फाशीची शिक्षा दिली गेली होती.[१८]

राघोजी भांगरे हा नगर नाशिकच्या सरहद्दीवर वास्तव्य करणारा असून त्याचे कोळी लोकांवर वर्चस्व होते. त्यालाही आपल्या जातीतील लोकांवर इंग्रजांनी केलेला अन्याय आवडलेला नव्हता. त्यामुळे तो बंडास प्रवृत्त झाला होता. इंग्रजाविरूध्द बंड करण्याकरिता साधन सामुग्रीची भरपूर जमावजमव व्हावी म्हून त्याने सावकराना अडवून पैसा उभा केला होता. अशा प्रकारची लुटमार सुरू केल्यामुळे त्याचा बंदोबस्त व्हावा म्हणून लोकांनी त्या विरूध्द ब्रिटिशाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यात सावकराच्या जास्तच सहभाग होता राघोजीच्या कारवाया दिवसेंदिवस वाढतच होत्या. सावकाराने राघोजीच्या संदर्भात माहिती ब्रिटिशांना दिलेली होती. त्यामुळे पोलिस त्याच्या पाठीमागे होते. पण तो पोलिसाच्या हाती लागत नव्हता. तेव्हा पोलिसाने राघोजी भांगरे याच्या म्हाताऱ्या आईला त्रास देण्याला सुरूवात करून तिचा अन्वीत असा छळ केला तरी तिने आपल्या मुलाचा किंवा त्याला मदत करणाऱ्या साथीदारांची माहिती देण्यास नाकारले होते.[१९] आपल्या आईचा छळ पोलिसांनी केल्यामुळे तर राघोजी भांगरे अधिकच संतापला व त्याने पोलिसांवर हल्ला केला ही बातमी पोलिसांना समजातच त्यांनी तेथून पळ काढा होता. सावकार लोकांच्या तक्रारीमुळे आपल्या

कुटुंबाला पोलिसांनी त्रास दिला त्यामुळे त्याने नाशिक व अहमदनगर जिल्हयात मारवाडी सावकार लोकांची नाके कापण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे या भागातील काही सावकार लोक कुटुंबासह अहमदनगर येथे वास्तव्याला आलेले होते. त्यांनी आपल्या तक्रारी प्रत्यक्ष जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्या होत्या. त्यामुळे राघोजीला पकडण्यासाठी ब्रिटिश पोलिस अकोल्याकडे रवाना झाले होते. ही बातमी राघोजीला कळताच तो भूमिगत झाला होता. पुढे त्याने आपला मोर्चा पंढरपूरकडे ओळवून तिकडे लुटालुट सुरू केली होती. शेवटी जनरल गेल याल सैन्य घेऊन त्याचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले होते. जनरल गेलने राघोजी भांगरे याला पंढरपूरमध्ये पकडून नंतर अहमदनगरला आणण्यात आले आणि पुढे त्याच्यावर खुनाचा आरोप ठेवण्यात आला होता. त्याची चौकशी होऊन त्याला फाशी देण्यात आली. १८४८ पर्यंत आपल्या वतनदाऱ्या गेल्यामुळे असंतुष्टपणे ब्रिटिश सरकार विरूध्द बंडाचे प्रयत्न अहमदनगर जिल्हयात सुरूच होते.[२०] इ.स. १८५७ पुर्वी अहमदनगर जिल्हयातील भिल्ल व कोळी लोकांनी ब्रिटिशांविरूध्द सशस्त्र उठाव केलेले होते. हे बंड जरी ब्रिटिशाने मोडून काढले असले तरी नंतरच्या काळात अशाच स्वरूपाचे बंड या भागात झालेले होते.

एकूणच वरील सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की, इ.स. १८५७ च्या उठावात आदिवासी जमातींचे योगदान निश्चित असले तरीही आदिवासींचे हे उठाव इ.स. १८५७ च्या पूर्वीपासूनच सुरू झालेले होते.

इ.स. १८५७ चा उठाव हा भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व मानले जाते. ही घटना भारताच्या इतिहासाच्या दृष्टीने जेवढी महत्त्वपूर्ण होती तेवढीच महत्त्वपूर्ण ती महाराष्ट्राच्या इतिहासाच्या बाबतीत होती. १८५७ च्या उठावात विविध वर्ग, वंचित गट आपआपल्या हितासाठी, अस्तित्वासाठी, स्वातंत्र्यासाठी झगडत होते. भारतात सत्ता स्थापन करीत असताना ब्रिटीशांचे अनेक ठिकाणी आदिवासी जमातीबरोबर संघर्ष झाले होते. यात उत्तर अहमदनगरमधील भिल्लांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला होता. अहमदनगर जिल्हा हा निजामी प्रदेशाच्या सरहद्दीवर होता त्यामुळे ब्रिटिश भागात लुटालूट

करून निजामी प्रदेशात पळून जाणे भिल्लांना सोपे होते. त्यांच्या सैन्यात रोहिले पठाणांची संख्याही लक्षणीय होती. त्यांच्यात राष्ट्रवादाची भावना आपल्याला पहावयास मिळते. वासुदेव बळवंत फडक्यांनी देखील भिल्लाची भरती आपल्या सैन्यात केली होती. आपल्या मर्यादांची तुटपुंज्या साधन सामुग्रीची व मनुष्यबळाची कल्पना असतानाही या तळागाळातील लोकांनी आपली भूमिका व्यवस्थित बजावली होती. आणि ब्रिटिशांविरूद्ध केलेल्या संघर्षामुळे १८५७ ची पार्श्वभूमी तयार झाली होती.[१]

महाराष्ट्रातील दक्षिण नाशिक आणि उत्तर अहमदनगर या ठिकाणच्या भिल्ल आणि कोळी या जमाती पेशव्यांचे कट्टर समर्थक असल्याने ते इंग्रजांशी सतत युद्ध करीत होते. अगदी १८५७ चा उठाव होण्यापूर्वीपासूनच ब्रिटीशांविरूद्धचे भिल्लांचे उठाव सूरू झालेले होते. आदिवासी जमातींनी बंड करायचे, इंग्रजांच्या प्रदेशात लुटालुट करायची आणि इंग्रजांनी या जमातींमध्ये दहशत पसरावी म्हणून त्यांची धडपकड करायची व त्यांना कठोर शिक्षा करायची हे नित्याचेच समीकरण बनलेले होते. बंडवाल्यांना कठोर शिक्षा केल्या किंवा फाशीच्या शिक्षा दिल्या, तर त्यांच्या बंडाची धार कमी होईल हा ब्रिटीशांचा विश्वास निष्फळ ठरत होता. ब्रिटीशांनी रामजी भांगरे आणि राघोजी भांगरे यासारख्या आदिवासी जमातीतील नेत्यांना फाशीच्या शिक्षा सुनावल्या होत्या असे असले तरीही १८५७ च्या उठावात या आदिवासी जमातींनी अगदी सक्रीय असा सहभाग घेतलेला होता.

१८५७ च्या उठावाच्या बाबतीत विचारकरताना हे स्पष्ट होते की, या बंडाची सुरूवात शिपायांच्या उठावातून झाली. या उठावात ब्रिटीशांच्या विरूद्ध असलेल्या प्रत्येक असंतुष्ट अशा गटाने आपआपल्या परीने सहभाग घेतला. सहाजिकच त्यामध्ये संस्थानिक, कामगार, शेतकरी व आदिवासी जमातीही होत्या. महाराष्ट्रापुरता विचार करता असे लक्षात येते की या बंडाचा प्रभाव महाराष्ट्रावर पडणेही स्वाभाविक होते. महाराष्ट्रात ब्रिटीश कालखंडात जेवढे उठाव झाले त्यांची कारणे, स्वरूप वेगवेगळी होती. अगदी बंड यशस्वी होण्याची शक्यता नसतांनाही बंडवाले बंड करीत होते. कित्येकदा या

बंडवाल्यांनाच अपयश येत असे, त्याची कारणेही तशीच होती. त्यामध्ये सुसूत्रीकरणाचा अभाव, उदासीनता, मर्यादीत शस्त्रसाठा, फितूरी इत्यादींचा समावेश होता. परंतू असे असतानांही 'यश येवो अथवा न येवो' परकीय राजवट उलथवून टाकणे ही त्यामागची मुख्य भूमिका होती. व या भूमिकेतून हे बंड घडून आलेले होते.[२]

ब्रिटीश राजवटीला विरोध करण्यासाठी भारतात जे उठाव झाले त्या सर्वांचा बंदोबस्त करण्याचा परकीय राज्यकर्त्यांनी प्रयत्न केला होता. त्यासाठी स्थानिक प्रजेवर शस्त्रबंदीसारखे कायदे लादून त्यांच्याकडे असलेली सर्व शस्त्रे सरकारकडे जमा करावीत असा जाहीरनामा ब्रिटीशांनी काढला होता. या शस्त्रबंदीच्या हुकुमाला बेरड, भिल्ल, कोळी इ. आदिवासी जमातींनी प्रतिसाद दिला नाही. अनेक टोळी प्रमुखांना हा जाहीरनामा मान्य नव्हता. त्यामुळे त्यांनी सरकारशी असहकार पुकारून अनेक ठिकाणी बंड केले होते. त्यामुळे महाराष्ट्रात अनेक भागात याची ठिणगी पडली होती.[३] १८५७ चे बंड आणि त्यामधील भिल्लांचा सहभाग एवढयाच पूरता विचार केला तर असे लक्षात येईल की ब्रिटीशांना सत्ता स्थापन करीत असतांना भिल्लांच्या प्रखर विरोधाचा सामना करावा लागला होता. विशेषत: १८५७ च्या उठावात दक्षिण नाशिक आणि उत्तर अहमदनगरच्या भिल्लांनी मोठया संख्येने सहभाग घेतलेला होता. तत्कालीन अहमदनगर जिल्हा हा निजामी प्रदेशाच्या हद्‌दीत असल्यामुळे इंग्रजी भागात लूटमार करून निजामी प्रदेशात पळून जाणे सोपे जात होते. त्यामुळे अहमदनगर प्रांत भिल्लांच्या बंडासाठी अनुकूल ठरत होता. भिल्ल जमातींना आपल्या मर्यादा, अपुरे मनुष्यबळ व शस्त्रांस्त्रांची कल्पना होती. अशा परिस्थितीत या तळागाळातील लोकांनी आपली भूमिका बजावली होती व त्यातूनच महाराष्ट्रात एक नवे राजकारण आकाराला आले होते. इंग्रजांनी सर्वप्रथम १७५७ मध्ये प्लासीच्या लढाईने आपली सत्ता भारतात प्रस्थापित करायला सुरूवात केली होती व पुढील काळात त्यांनी संपूर्ण भारतावर आपला अंमल प्रस्थापित केला होता. प्लासीच्या लढाईनंतर बरोबर १०० वर्षांनी ब्रिटीशांच्या विरोधांना मोठे बंड घडून आले. या बंडापूर्वीही अनेकांनी ब्रिटीशांना

विरोध केला होता, तो विरोध ब्रिटीशांनी क्रूर पद्धतीने दडपविण्याचा सतत प्रयत्न केलेला होता.

महाराष्ट्र व खानदेशात मोठया स्वरूपाचे बंड झाले होते. या बंडांचे नेतृत्व भागोजी नाईकाने स्वीकारले होते. भागोजी नाईक यांचा प्रभाव भिल्ल समाजावर विशेष असल्यामुळे कोपरगाव, राहूरी, पारनेर, आकोले, सिन्नर व निजामी राज्यातील ५० ते ६० भिल्लांच्या टोळया त्याला येऊन मिळालेल्या होत्या. इ.स. १८५७ मध्ये अकोला, संगमनेर, राहुरी आणि पारनेर या भागातील ७००० भिल्ल भागोजी नाईकाच्या नेतृत्वाखाली संघटित होवून ब्रिटीशांविरूद्ध संघर्षाची तयारी करू लागले होते. कोणत्याही संस्थानिकाची मदत नसतानाही केवळ स्वयंस्फूर्तीने या आदिवासी क्रांतिकारकांनी उत्तर भारताइतका पराक्रम अहमदनगरमध्ये गाजवला यावरून अहमदनगरमधील भिल्ल क्रांतिकारकांचे स्वदेश प्रेम निश्चित मान्य करावे लागते. अहमदनगर जिल्हयातील बंडाचे नेतृत्व करणारे बंडोजी नाईक हे अकोले तालुक्यात पोलीस खात्यात जमादार होते. इ.स. १८५५ मध्ये त्याने आपल्या कामात दुर्लक्ष केले. प्रत्यक्ष बंडात भाग न घेता बंडामध्ये भाग घेतलेल्या आपल्या जातभाई बंडखोरांकडे दुर्लक्ष केले होते. अर्थात अप्रत्यक्षपणे त्यांना मदत केली होती. या आरोपाखाली इंग्रजांनी त्यांना पकडून शिक्षा ठोठावली. इंग्रज अधिकाऱ्यांकडून पोलिसांमार्फत आपल्या जातबांधवांवर किंवा निरपराधी जनतेवर होणारे अन्याय भागोजीने आपल्या डोळयांनी पाहिले होते. त्यामुळे त्याचा स्वाभिमान जागृत झाला होता. एक वर्षाची शिक्षा पुरी होताच, परत एक वर्ष चांगल्या वागणुकीचा जामिन त्याला दयावा लागला होता. परंतु जामीनाचे एक वर्ष पूर्ण होण्याच्या अगोदरच तो बंडात उतरला होते.[४]

भागोजीने दिनांक १० ऑगस्ट, १८५७ रोजी (शनिवारी) अहमदनगर भागात उठाव केला होता. भागोजीच्या लढाईचा जोर वाढत चालल्यामुळे त्याचा बंदोबस्त करणे, इंग्रजांना भाग होते. दिनांक ४ ऑक्टोबर १८५७ रोजी लेफ्टनंट जे.डब्ल्यू हेन्री हा थॅचर व टेलर यांच्या नेतृत्वात दोन पलटनी घेवून भागोजी नाईकावर चाल करून आला होता. पहिली चकमक नांदूर शिंगोटेच्या टेकडीवर

झाली होती. त्यावेळी शरण येण्यास भागोजीला निरोप पाठविण्यात आला होता. पण भागोजी शरण गेला नाही. परिणामी इंग्रजी सैन्याशी भागोजीची जोराची लढाई सुरू झाली. भागोजीने हेन्रीवर दोन गोळया झाडून त्याचा बळी घेतला होता. त्यामुळे थॅचरने दोन्ही पलटणीसह माघार घेतली होती. परंतु लेफ्टनंट टी. थॅचर व मास्टर टेलर यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश फौंजानी भिल्ल बंडखोरांवर जोरदार हल्ला केला त्यात अनेक भिल्ल मारले गेले होते. त्यानंतरही भिल्लांनी अनेक ठिकाणी इंग्रजांच्या विरूद्ध उठाव सुरूच ठेवले.[५]

महाराष्ट्रात इ.स. १८५७ च्या उठावाची जबाबदारी साताऱ्याच्या रंगो बापूजीवर टाकण्यात आलेली होती. तर अहमदनगरची जबाबदारी भागोजी नाईकावर टाकण्यात आलेली होती. १८५७ च्या बंडांच्यावेळी अहमदनगर जिल्हयात मोठया प्रमाणावर अस्वस्थता दिसत होती. दक्षिण नाशिक व उत्तर अहमदनगर जिल्हयातील ७००० भिल्ल बंडखोरांनी ब्रिटीश सत्ता उलथून टाकण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यामुळे बंडखोरांना निपटून काढण्याचे काम पोलिसांवर सोपविण्यात आले होते. त्यासाठी एक खास कोळी पलटण, घोडदळ व पायदळाच्या तुकडीने पोलिसांची शक्ती वाढविण्यात आली. भागोजी नाईकाच्या नेतृत्वाखाली नाशिक आणि अहमदनगर येथे भिल्ल उठाव करत होते. १८ ऑक्टोबर १८५७ रोजी अकोला तालुक्यातील समशेरपूरच्या डोंगरी टेकडयामध्ये भिल्ल आणि पोलीस व कर्नल मॅकनच्या नेतृत्वाखाली संघर्ष झाला होता. त्यात पोलिस कर्तव्यावर असलेले लेफ्टनंट ग्रॅहम व एफ.एस.चॅपमन हे जखमी झाले होते.[६] भागोजी नाईकाचा बंदोबस्त करण्यासाठी अहमदनगरच्या पोलिस सुपरिडेंट लेफ्टनंट जे.डब्ल्यु हेन्री हा नांदूर शिगोंटे येथे येवून दाखल झाला होता. त्याने एकदम बंडखोरांवर हल्ला न करता संगमनेर आणि सिन्नर येथील मामलेदारांना भागोजीचे मन वळवून शरण येण्यासाठी पाठविले होते. परंतु शरण येण्यास भागोजीने नकार देताच भिल्ल व इंग्रज याच्यात संघर्ष सुरू झाला होता.

- **अकोला येथील भिल्लांचा उठाव –**

भागोजी नाईकाच्या बंडाचा उगम हा खऱ्या अर्थाने अहमदनगर जिल्हयातील अकोले या ठिकाणाहून झालेला होता. तो अकोले तालुक्यात पोलिस खात्यात जमादार म्हणून नोकरी करत होता. ब्रिटीशांकडे चाकरी करीत असतांना त्याने सुरवातीस अतिशय निष्ठेने आणि ब्रिटीशांशी एकनिष्ठ राहून चाकरी केलेली होती. परंतू हीच निष्ठा चाकरी करीत असतांना ब्रिटीशांनी भारतीयांवर चालविलेला अन्याय व अत्याचार त्याने अगदी जवळून पाहिलेला होता. त्यामुळे त्याने इ.स. १८५५ पासून आपल्या राज्यनिष्ठेच्या कामात दुर्लक्ष केले. प्रत्यक्ष बंडात सहभागी न होता त्याने भिल्लांमार्फत होणाऱ्या बंडाळीकडे दुर्लक्ष करण्यास सुरूवात केली होती व त्यांना अप्रत्यक्षरित्या मदत केलेली होती. ब्रिटीशांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी भागोजीस शिक्षाही केलेली होती. ब्रिटीश अधिकाऱ्यांकडून पोलिसांमार्फत भिल्लांवर जाणीवपूर्वक अन्याय अत्याचार केले जात होते. याचीच चीड भागोजीला होती. ब्रिटीशांनी केलेला स्त्रियांचा छळ भागोजीने पाहिला होता. सैनिकांच्या गोळीबाराला बळी पडलेल्यांचे आणि फासावर लटकविलेल्या क्रांतिकारक बंडखोरांचे भीषण चित्र त्यांच्या डोळयासमोर उभे होते. दिवसेंदिवस होत असलेल्या अन्यायाची आणि अत्याचाराची एकूणच परिस्थिती त्यास पाहवत नव्हती म्हणून त्याने बंडवाल्यांना सहाय्य करण्यास सुरूवात केली.

नांदूर शिगोंटे येथे भागोजीने दिलेली झूंज एवढी निकराची होती की, त्याच्या पहिल्या गोळीतच हेन्री घोडयावरून खाली पडला व दुसऱ्या गोळीला तो मृत्यूमुखी पडला. ब्रिटीशांच्या सैन्यांची ही खूपमोठी हार होती. त्यामुळे थॅचरने आपल्या दोन्ही पलटनींसह माघार घेतली होती. त्यानंतर पुन्हा थॅचर व टेलर यांनी भिल्लं बंडखोरांवर हल्ले चढविलेले होते. या हल्ल्यात अनेक भिल्ल ठार होऊ लागले त्यामुळे अनेक भिल्ल जीव वाचविण्यासाठी पळून जाऊ लागले होते. बंडखोर भिल्लांना मात्र या पळकुटे पनाचा राग येत होता. त्यांच्या दृष्टीने ही एक शरमेची बाब होती

असे असतांनाही भिल्लांनी अनेक ठिकाणी इंग्रजांच्या विरूद्ध उठाव चालूच ठेवलेले होते.[७]

- **पारनेर येथील भिल्लांचे उठाव –**

पार्थजी नाईक हा आपल्या दिडशे साथीदारांसह राहूरी आणि पारनेर भागात इंग्रजांशी लढा देण्यास तयार होता. तसा त्याने तिकडे धुमाकूळ मांडला होता. ही बातमी अहमदनगर येथे येवून पोहोचताच त्याच्यावर सैन्याची तुकडी न पाठवता त्याला उपदेशाच्या दोन गोष्टी सांगून त्याच्या टोळीचे निशस्त्रीकरण करावे असे दादोबा पांडुरंग डेप्युटी मॅजिस्ट्रेट अहमदनगर यांनी ठरविले होते. त्यांनी बरोबर पोलीस नेल्यास हे बंडखोर बिथरतील असा विचार करून दादोबा पांडुरंग आपल्या कारकूनासह पार्थजी नाईकाच्या तळावर गेले होते. अधिकारी या नात्याने आपल्याला भेटण्यास न येता आपला हितचिंतक या नात्याने आपणास भेटण्यास आलो आहोत असा धोका पत्करून दादोबांनी पार्थजी व अन्य भिल्ल नेत्यांशी समोरासमोर चर्चा करून बंडखोरीपासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता.[८]

पार्थजी नाईकाची खात्री होताच त्यानी आपल्या काही लोकांना सावधगिरीचा इशारा देवून एका टोळीसह मेजिस्ट्रेट दादोबा पांडुरंग यांच्या भेटीला तो आला दादोबांनी निशस्त्रीकरणाचा जाहीरनामा पार्थजी नाईकाला वाचून दाखविला. इंग्रजांच्या सशस्त्र दलापुढे पार्थजी नाईकाचा टीकाव लागणार नाही. निष्कारण प्राणास मुकावे लागणार यापेक्षा शस्त्र कायदयाप्रमाणे ब्रिटीश सरकारच्या स्वाधीन करून गुण्यागोविंदाने वागावे असा उपदेश केला होता. त्यावेळी पार्थजी नाईकाने आपले म्हणणे त्यांच्यापुढे मांडले होते. आम्ही पेशवे सरकारचे पिढीजात नोकर आहोत, आमच्या बापजादयांना पेशवे सरकारने ३० गडाची आणि ६० गावाची वतनदारी दिली होती. ती या टोपीवाल्यांनी हिसकावून घेतल्यावर आम्ही आमच्या वतनाकरिता झगडवयास नको का ? यावर दादोबा पांडुरंगांनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. दादोबांच्या बोलण्याचा परिणाम होवून आपले शस्त्र पार्थजी नायकाने त्याच्यांपुढे आणून ठेवली आणि टोळीवाल्यांनी त्याचा

कित्ता गिरविला व ते आपल्या घरी निघून गेले होते. हळूहळू बंडखोरांचे निशस्त्रीकरण सुरू झाले. निशस्त्र झालेल्या बंडखोरांना पकडून शिक्षा करण्यात येणार अशी अफवा उठताच अकोले आणि सिन्नर भागात भागोजी नायकाने तर राहुरी आणि पारनेर भागात परत इंग्रंजाविरूद्ध संघर्ष सुरू केला. अधिकाऱ्याच्या हाताखालचे बाहुले असणाऱ्या सावकारांची घरे त्यांनी लुटली होती. या लुटालुटीच्या बातम्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर येऊ लागल्या होत्या.[९]

भिल्ल बंडखोर हे आपल्या सैन्यबळाला व जाहीरनाम्याला भीक घालीत नाही, उलट त्यांच्या संघटना वाढत आहेत, असे वरिष्ट अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच. भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी योजना आखली पाहिजे, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटत होते. राहुरी भागात पार्थजी नाईकाने याचकाळात राहुरी सब डिव्हिजनमध्ये १०० भिल्लांची तुकडी उभारली होती व या तुकडीला घेऊन तो भागोजीला मदत करण्यासाठी गेला होता. राहुरी भागात झालेल्या संघर्षात लेफ्टनंट हेन्री ठार झाला. त्यामुळे लेफ्टनंट मॉटगोमेरीने भिल्ल सैन्यावर हल्ला केला. मॉटगोमेरीच्या सैन्यापुढे आपला निभाव लागणे कठीण आहे हे लक्षात येताच त्यांनी पळून जाऊन डोंगराचा आश्रय घेतला. पण संधी सापडताच ते हल्ला करत असत. तसेच इंग्रजांच्या छावण्यावर छापा घालत, दिवसेंदिवस भिल्लांची संख्या वाढत चालली होती.[१०]

- **कोळी सैन्यदल पटलनची उभारणी :**

भिल्लांचे वाढते संघटन ब्रिटीश अधिकाऱ्यांना धोकादायक वाटत होते. भिल्लांचा बंदोबस्त लवकरात लवकर करण्यासाठी जनरल नटऑल याला कोळी लोकांचे सैन्य उभारण्याचा हुकूम देण्यात आला होता. त्यासाठी अकोले, संगमनेर आणि सिन्नर या आदिवासी भागात त्याला पाठविण्यात आले होते. त्याने भिल्लांविरूद्ध कोळी लोकांच्या सैन्यांची पलटन तयार केली होती. कोळी लोक हे शिवाजी महाराजांच्या काळापासून प्रख्यात होते. शूर व काटक म्हणून त्यांचा दबदबा होता. डिसेंबर १८५७ मध्ये जनरल

नटऑलने १०० माणसांना सैन्यात भरती करून लष्करी शिक्षण देऊन तयार केले.[११] कोळी लोकात आपुलकी निर्माण व्हावी आणि आपल्या पलटणीवर आपल्याच जमातीतील अधिकारी आहेत ही भावना निर्माण करण्याकरिता 'बोमला'कोळी जमातीतील प्रमुख जावजी बोमला या कोळयाला त्या पलटणीवर हवालदार म्हणून नेमण्यात येऊन राघोजी भांगरे याच्या भावास जमादार म्हणून नेमण्यात आले होते.

इंग्रज हे मुत्सदी होते काटयाने काटा काढावा या न्यायाने कंपनी सरकारने राघोजी भांगरे याच्या भावास आपल्या बाजूने वळविले व भागुजी नाईकाविरूद्ध लढण्यास पुढे उभे केले. या भागातील बंड मोडण्याकरिता आणि बंडखोरांचा बिमोड करण्याकरिता मोठया चातुर्याने उपाययोजना करून प्रत्यक्ष आपली कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही असा डाव कंपनी सरकारने टाकला होता. भिल्लांना पोलीस खात्यात घेऊन त्यांना संतुष्ट करण्याचे धोरण इंग्रजांनी चालु ठेवले होते. इंग्रज अधिकाऱ्याच्या नवीन योजनेमुळे काही काळ शांततेत गेला असला असे जरी वाटत असले तरीपण ही शांतता वरवरची होती. कारण स्थानिक अधिकारी म्हणजे ज्यांची वतने नष्ट झाली होती. त्या असंतुष्ट लोकांच्या गुप्त चिथावणीमुळे व उत्तरेकडून इंग्रज अधिकाऱ्यांस ठार करणाऱ्यास बक्षीस देण्यात येईल अशा बातम्या येत असल्यामुळे नाशिक, अकोले, खानदेश व निजामाचे राज्य यातील बंडावाल्यांनी परत उठाव केले होते. ही संधी साधून काही काळ शांत असणाऱ्या भागोजी नायकाने व हरजी नायकाने अहमदनगर जिल्हयाच्या अकोले, संगमनेर भागात उठाव केले होते. भागोजी नाईक समशेरपूर परिसरात आहे, असे कळाल्यावर लेफ्टनंट मॉटगोमेरीने ससैन्य भागोजीला वेढले होते. पण भागोजीने स्वत:ची सुटका करून घेतली.[१२]

**संगमनेर येथील भिल्लांचे उठाव :**

भागोजी नाईक आपल्या सहकार्यांसह संगमनेर, अंभोरदरा येथे आहे असे समजताच कॅप्टन नटऑलने त्यांच्यावर सैन्य पाठवले होते. या लढाईत भागोजीचा मुलगा यशवंत व इतर १० जण ठार झाले. हरजी नाईक या

विश्वासू सहकार्यांसह इतर तिघे कैदेत सापडले. भागोजी मात्र पळून जाण्यास यशस्वी झाला. इ.स. १८५९ च्या ऑक्टोबर मध्ये भागोजीला भेटण्याच्या उद्‌देशाने भिल्लांच्या टोळया निजामाच्या प्रदेशात असलेल्या भागोजीला भेटण्यासाठी जमा होऊ लागल्या होत्या. ही बातमी ब्रिटीशांना समजली होती. ब्रिटीश प्रदेशाच्या जिल्हयांमध्ये सुद्धा त्यांचा बंदोबस्त करण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. या परिस्थितीत स्थानिक सैनिकांची एक तुकडी सिमेवर ठेवण्यात आली व पुणेरी घोडे असलेल्या तुकडीने त्यांच्यावर पहारा ठेवला होता.

**कोपरगावमधील भिल्लांचे उठाव :**

इ.स.१८५९ च्या एप्रिल, मे महिन्यात भागोजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली सैनिक अहमदनगर जिल्हयात आढळत होते. दिनांक २६ ऑक्टोबर १८५९ रोजी भागोजीने कोपरगाव तालुक्यातील 'कोऱ्हाळा' गाव लुटले होते. त्यावेळी त्याने १८००० रूपये (१८०० पौंड) एवढी संपत्ती लुटली होती. कॅप्टन नटऑलने भागोजीचा सहयाद्रीपासून नगरजिल्हयापर्यंत पाठलाग केला होता. अत्यंत गुप्त व चपळ स्वरूपाच्या हया हालचाली होत्या. अखेर ११ नोव्हेंबर रोजी कॅप्टन फ्रॅंकसुटरने (नवीन जिल्हा पोलिस अधिक्षक) यांनी बंडखोरांचा पाठलाग केला होता. इंग्रज अधिकाऱ्यांने आपल्या बरोबर लढण्यास आपल्या जात बांधवांचा उपयोग केला आहे. हे बंडखोरांच्या लक्षात येताच त्यांनी आपली बाजू बळकट करण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी सिन्नर, निजामाचे राज्य आणि नगरजिल्हयातील नेवासे या भागात आपले प्रचारक पाठवून त्यांना मदतीस येण्याकरिता बोलावले होते. निरोप मिळताच त्या भागातील लोकांनीही मदत देण्याचे कबुल केले होते. याप्रमाणे परत दिवसेंदिवस भिल्लांची संघटना व्यापक होत चालली होती. हे ब्रिटीशांना समजताच जिल्हाधिकाऱ्यांनी बंडखोरांचा शेवट करण्याकरिता 'सर फ्रॅंकसुटर' या पोलिस प्रमुखाची त्या कामावर नेमणुक केली होती.[१३]

फ्रॅकसुटर सैनिकांच्या तुकडीसह बंडखोरावर चालून गेला होता. नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यात असलेल्या मीठसागर या गावी बंडखोर आणि ब्रिटीश सैनिक यांच्यात संघर्ष झाला होता. या संघर्षात भागोजी नाईकाने सुटरवर हल्ला केला होता. सुटर जमिनीवर कोसळला. त्यामुळे इंग्रज सैनिक अधिक खवळले आणि इंग्रजांच्या गोळीबाराला भिल्ल क्रांतिकारक एकामागून एक बळी पडत होते. इंग्रजी सैन्याचा एक भाग नदी उतरून खाली आला व ‘युद्ध थांबवा, शरण या, माफी मिळेल’ असे हे सैनिक सारखे ओरडून सांगत होते. पण भागोजी नाईक व त्यांचे क्रांतिकारक सहकारी शरण न येता सारखे लढत होते. अंधार पडण्याच्या सुमाराला बहुतेक सर्व क्रांतिकारक एकतर मेले होते अगर जखमी होऊन पडले होते. अंधार पडल्यामुळे इंग्रजांनी लढाई थांबविली होती.[१४] रात्री खंडेराव काळे सांगवी गावातून बेटात आले होते. त्यावेळी भागोजी जखमी होऊन पडलेला त्यांनी दिसला. त्याला उचलून खंडेराव काळे यांनी आपल्याकडे आणले होते. ‘‘पेशव्यांच्या व तात्या टोपेच्या इच्छेप्रमाणे मातृभूमीकरिता आपण प्राण जाई पर्यंत लढलो. क्रांतीची पेटलेली ही ज्वाला आताच यशस्वी व्हावी ही परमेश्वरी इच्छा दिसत नाही. पेटलेली ही ज्वाला यापुढे या ना त्या स्वरूपात पेटत राहून अखेर परमेश्वरी कृपेने यशस्वी होईल’’ असे म्हणून भागोजीने प्राण सोडला. त्याचा रातोरात अंत्यविधी उरकून सांगवीच्या काळे कुटुंबाने सांगवी गाव सोडले होते.[१५]

सुटर सकाळी उठून पाहतो तर सर्व क्रांतिकारक लढता—लढता मृत्युमुखी पडल्याचे त्याला दिसून आले होते. काळे कुटुंब गावी नसल्याचेही सांगण्यात आले. तेव्हा सुटरने रागाच्या भरात सांगवी गाव जाळून उद्धवस्त करून तो परत निघाला होता. भागोजी नाईकाच्या मृत्यूनंतर नाशिक व अहमदनगर जिल्हयात सुरू झालेले क्रांतियुद्ध आपोआप संपले होते. भागोजीचा नातेवाईक मारडोइया यांनी पुढे काही क्रांतिकारक गोळा करून उठाव करण्याचा प्रयत्न केला. सुटरचा नोकर व भिल्लांची बातमी देणारा एक कोळी येसू, त्यांची बायको व मुले यांचा मारडोइया याने खून केला. तेव्हा

म्हारडी व त्याचे पाच साथीदारांना नोव्हेंबर १८५९ मध्ये पकडून इंग्रजांनी फाशी दिली होती.[१६]

क्रांतीवीर भागोजी नाईक यांनी सिन्नर तालुक्यातील नांदुर शिंगोटे येथे सुरू केलेले क्रांतियुद्ध सिन्नर तालुक्यातील सांगवी येथे त्यांच्या मृत्युमुळे संपले होते. भागोजी नाईकाला सहकार्य केले म्हणून सांगवीच्या काळेचे वतन, इनाम, कमिशन खालसा केले होते. पुढे काळे कुटुंब लपून–छपून चंद्रचूड यांच्या आश्रयाने नेवासे येथे राहिला होता. त्यांना १८६० ते १९२६ या काळात फार दारिद्रयात जीवन काढावे लागते. सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथील पाटलाला त्याच्या फितुरीबद्‌दल इंग्रजांनी तीनशे एकर जमीन इनाम दिली होती. ती अजून आहे. सिन्नर तालुक्यातील तमाम नागरिकांच्या दृष्टिने अभिमानास्पद असणाऱ्या आद्य क्रांतिकारक भागोजी नाईक यांच्या जीवन कार्याची स्मृति सर्व देशवासियांसाी निश्‍चितच महत्त्वाची आहे. ते ज्या ठिकाणी मातृभूमीसाठी लढता–लढता धारातीर्थ पडले; त्या सांगवी या गावी अजूनही त्यांचे राष्ट्रीय स्मारक निर्माण होऊ शकले नाही.

**नेवासा व सोनई येथील उठाव :**

इ.स. १८५७ व इ.स. १८५९ भागोजी नाईकचे सतत लढयामुळे भाऊ महिपती, मुलगा यशवंत, सहकारी हरजी नाईक, मित्र कचर सिंग, पार्थजी नाईक असे त्यांचे सहकारी यांचा शेवट झाला होता. तरीही इंग्रज मुलखात लुटालूट करणे, सहकारी यंत्रणा मोडून काढणे व निजामाच्या मुलखात पळून जाणे अशी भिल्लांची युद्ध नीती होती. इंग्रज अहवालात नमूद केल्याप्रमाणे दिनांक ११ नोव्हेंबर १८५९ रोजी सिन्नर तालुक्यातील मीठसागरी येथे भागोजी नाईकाचा अंत झाला होता. मारडोइया याने इंग्रजांबरोबर नेवासा व सोनई या भागात लढाई केली होती. तो सुटर याला मारण्यास निघाला होता, फ्रॅकसुटर हा उपस्थितीत नसल्यामुळे त्याचा नोकर जो हेरगिरी करीत होता. त्याला म्हारडिया या भिल्लाने ठार मारले. त्यावेळी याला व त्याच्या साथीदारांना पकडून फाशी देण्यात आली होती.

इ.स. १८५५ ते १८५९ या काळातील भागोजी नाईकाने सुरू केलेले हे स्वातंत्र्ययुद्ध संपुष्टात आले होते. या काळात लढाई झालेल्या या रणभूमीवरील घटनांशी संबंधित डॉ.वा.द.दिवेकर आणि इतरांनी शोध घेतला असता काही गोष्टी सिद्ध केल्या. नांदूर शिंगोटे येथे रणक्षेत्रात हेन्रीचा स्मृति स्तंभ आहे. वीराचे मरण झाल्यास तेथे समाधी उभारली जाते. त्याप्रमाणे नांदूर–शिंगोटे येथे समाधी, शिलालेख, वीरगळ घोडयावर स्वार दाखवलेला आहे.[१७]

दिनांक १७ ऑक्टोबर १८३१ रोजी अहमदनगर जिल्हयातील भागोजी नाईक भिल्ल याचे सहा साथीदार इंग्रजांना सापडले होते. त्यांना निंबगाव यारली (नगरच्या वायव्येस २५ मैलावर) येथे फाशी देण्यात आली होती. इंग्रजांना कोळी हेर येसू याने भिल्लांच्या सर्व गुप्त बातम्या इंग्रजांना पुरविल्या होत्या. म्हणून या सहा भिल्लांनी यात मोरडोइया हा देखील होता. यांनी येसू व त्याची बायको व मुलगा या तिघानांही ठार मारले होते. या सहा भिल्लांना इंग्रजांनी फाशी देण्याच्या दिवशी पुष्कळ भिल्ल तेथे जमले होते. या भिल्ल लोकांच्या उठावाबाबत इंग्रजांना दोषी धरून ज्ञानप्रकाश लिहितो कि, ‘‘सुधारलेले इंग्रज या देशात राज्यकर्ते झाले असून त्याला मानवजातीचे या अनादि, अज्ञानी जातीस सज्ञानी करून त्यास इतर मानवाप्रमाणे मानव बनविण्याची तजवीज त्याच्याकडून होत नाही. ही मोठी शरमेची व लांछनाची गोष्ट या सरकारमध्ये आहे असे समजले जात होते.[१८]

भागोजी नाईकाच्या मृत्यूची बातमी समजताच काही भिल्ल खानदेशात पळाले व तिकडे त्यांना पकडण्यात आले होते. त्यांनी काहीही गुन्हा केलेला नसल्यामुळे त्यांना माफी देण्यात आली होती. जरी उठावाचा शेवट झालेला होता तरी सैनिकांच्या तुकडीची नियमित पदे इ.स. १८६० पर्यंत ठेवण्यात आलेली होती.[१९]

लष्करी सैन्य तुकडीला बंडखोरांवर दहशत बसविण्याकरिता अकोले, सिन्नर, संगमनेर या भागातील डोंगराळ प्रदेश ठिकठिकाणी तैनात करण्यात आले होते. कोणतेही कारण पुढे करून हे लोक उठाव करीत नाहीत. व

त्यांना चिथावणी देणाराचीही आता काही सत्ता चालत नाही असे पाहून एकंदर परिस्थिती आपल्या आटोक्यात आली होती अशी खात्री झाल्यावर नविन तयार केलेल्या पलटणी मोडण्यात आल्या व त्यातील काही लोकांना जमिनी देऊन शेतीच्या कामात गुंतविण्यात आले होते व काही आप—आपली शेती करून राहू लागले होते.[२०]

पुढे भिल्लांची पलटन बंद केली होती व त्याची जागा कोळी पलटणीने घेतली होती. ही 'सीमानिवेशसेवा' कोळी पलटनीने इ.स. १८३१ पर्यंत चालवली. ज्यावेळी ती बरखास्त करण्यात आली होती. त्यावेळी काहींनी पोलिस खात्यात प्रवेश केला होता. काही पुन्हा आपल्या खेडेगावी शेतीवर जीवन जगू लागले होते. ब्रिटीशांनी स्थापन केलेली पलटन उभी करण्याचा शहाणपणा योग्य असल्याचे सिद्ध झाले. अतिशय अशांतता जरी पूर्वी होती, तरी ती आता पसरली तर शिस्तबद्ध 'कोळी पलटन' ती अशांतता दूर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत होते. कॅप्टन नटऑलच्या विरोधात व दयाळू नियंत्रणाखाली व त्याच्या तडफदार पराक्रमाच्या व अथक कर्तृत्वाच्या उदाहरणाने ते एक अत्यंत आज्ञाधारक, शिस्तबद्ध, चपळ व धाडसी सैनिक असल्याचे सिद्ध झाले होते. त्यांनी ते भिल्लांपेक्षा शक्तिशाली, वरचढ असल्याचे सिद्ध करून दाखविले आणि त्यांच्या अडीच वर्षाच्या कार्यक्षम सेवेच्या काळात त्यांनी सरकारचे खास आभार प्राप्त करून घेतले होते.[२१]

इंग्रज सरकारने राज्यव्यवस्था चालविण्यासाठी अनेक कर जनतेवर लादले होते. त्यामुळे ब्रिटीश सरकारविरूद्ध राष्ट्रीय चळवळी झाल्या होत्या. या चळवळीत शेतकरी, कुणबी, कोळी, भिल्ल यांनी पुढाकार घेतला होता.

इंग्रजांना आपले राज्य वाढविण्यासाठी व स्थिर करण्यासाठी जेवढा कालावधी लागला नव्हता तेवढा कालावधी 'इ.स.१८५७ चा उठाव' मोडण्यासाठी लागता होता. असे उठाव पुन्हा होवू नये यासाठी बंडखोर जातीच्या पलटणी तयार केलेल्या होत्या. यांच्या मदतीने बंडखोरांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला गेला होता. त्यासाठी त्या तैनात ठेवण्यात आल्या होत्या. शस्त्रास्त्रे, दारूगोळा हा खर्च भागावा म्हणून मुंबई सरकारने

कलेक्टरच्या मार्फत जाहीरनामा काढला होता. तो अहमदनगर जिल्हयात प्रसिद्ध करण्यात आला होता. जाहिरनाम्याप्रमाणे उत्पन्नावरील व प्राप्तीवरील कर अहमदनगर जिल्हयातील सावकार व सामान्यावर लादल्यामुळे ते जागृत झाले होते. त्यामुळे सावकार हे व्यापारी नफ्याचा विचार करून सामान्य जनतेची पिळवणूक करू लागले होते. सावकार लोकांनी अशिक्षित शेतकऱ्यांना ब्रिटीश सरकार विरूद्ध उठाव करण्यास प्रोत्साहन करीत होते. कारण आपले उत्पन्न सरकारला समजू नये, व आपली या करातून सुटका व्हावी. म्हणून त्यांनी प्रयत्न केले होते.[२२]

अहमदनगर जिल्हयातील गरीब, शेतकरी, समाज हा सावकार आणि सरकार यांच्या जुलुमामुळे त्रस्त झाला होता. यातच या कराचे ओझे सावकार आणि व्यापारी याच्यावर नसून तेली, सुतार, लोहार याच्यावरही होते. त्यामुळे सरकार विरूद्ध चळवळी सुरू करून ब्रिटीश सरकारला विरोध करण्यात आला होता. परंतु ब्रिटीशांवर याचा कोणताही परिणाम झाला नाही. उलट त्यांनी अहमदनगर जिल्हयामध्ये विविध कर आकारण्यात सुरूवात केली होती. यामुळे नाखूष जनतेत ब्रिटिशांच्या नव्या राजवटीविषयी असंतोष निर्माण होत होता. पण लोकशक्ती जीवंत होती. याची जाणीव सरकारला करून देण्याकरिता गरीब आणि अडाणी शेतकरी वर्गाची बाजू घेऊन सावकारशाही विरूद्ध 'वासुदेव बळवंत फडके' या धाडसी पुरूषाने बंड केले होते. वासुदेव बळवंत फडके सारख खंबीर नेता मिळताच त्याला शेतकरी,कुणबीं, भिल्ल आणि रामोशी लोक सामील झाले होते. विशेषत: संगमनेर, पारनेर, कर्जत, जुन्नर, नाशिक, सिन्नर या भागातील आदिवासी लोकांनी चळवळीत प्रामुख्याने भागत घेतला होता. यात भागुजी केंजळे जांबोरी गावातील कोळी शेतकऱ्यांने तरूणांना संघटित करून सावकारांवर हल्ले केले होते. त्यामुळे तत्कालिन जिल्हाधिकाऱ्याला बंडखोराचा बंदोबस्त करणे भाग पडले होते. ब्रिटिश सरकार कर भरणाऱ्या सावकारांविरूद्ध उठलेल्या शेतकरी बंडखोराचे उठाव आणि सामान्य जनतेची नाराजी अशा दुहेरी प्रसंगात सापडले होते. तरी देखील बंडखोरांचा बंदोबस्त करणे हे

त्यांचे कर्तव्य होते. पुढे 'होन्या केंजळे' हा मेजर एच.डॅनियल या पोलिस सुपरेटेडेंटकडून जुलै १८७३ मध्ये पकडला गेला होता व त्याला फाशी देण्यात आली होती. या दोन वर्षात पारनेर, श्रीगोंदा, मदतीने श्रीगोंदा, नगर तालुक्यात सावकारांवर दरोडे घालण्यात आले होते.

इ.स. १८५७ या काळात विविध मार्गांनी भारतातील संस्थाने इंग्रजांनी खालसा केली होती. त्यावेळी साम्राज्यविस्तार करून भारतातील जनतेवर इंग्रजांनी अन्याय व अत्याचार केले होते. भारतीयांच्या धार्मिक भावना पायदळी तुडविल्या होत्या. भारतीयांच्या धार्मिक पिळवणुक केली होती. त्यामुळे भारतीय जनतेमध्ये ब्रिटिशांविरूद्ध असंतोष निर्माण झाला होता. ब्रिटिश सत्तेविरूद्ध भारतीयांनी एकत्र येऊन उठाव केला होता. पण ब्रिटिशांनी शस्त्र बळाच्या आधारावर इ.स. १८५७ चा उठाव दडवूण टाकला होता. पुढे इंग्रजी शिक्षणामुळे अनेक चळवळी निर्माण झाल्या. व भारतीय सुशिक्षित वर्ग आत्मचिंतन करू लागले. या इंग्रजी शिक्षणामुळे राष्ट्रवाद निर्माण झाला होता. राजकीय संघटना स्थापन झाल्या होत्या. त्यामुळे पुढे प्रांताऐवजी राजकीय स्वरूपाची संघटना निर्माण व्हावी असा विचार झाला होता. त्यातूनच दिनांक २८ डिसेंबर १८८५ रोजी 'राष्ट्रीय सभेची' स्थापना झाली. या सभेमार्फत भारतीयांच्या मागण्या, इच्छा, आकांक्षा, अडचणी ब्रिटीश सरकारपुढे मांडल्या जाणार होत्या. त्यानंतर प्रत्येक जिल्हयात राष्ट्रीय सभेच्या शाखा स्थापन झाल्या होत्या.[२३]

इ.स. १८५७ चा उठाव हा सुरवातीचा एक प्रयत्न होता. तो एक राष्ट्रीय प्रयोग होता, त्याचे मूल्यमापन करताना आज अनेक कसोटया जरी वापरल्या तर त्या कमी पडतील. इंग्रजांचे वर्चस्व, मुत्सद्दीपणा फार कार्यक्षम होता. बंडांचा बीमोड करताना परकिय राज्यकर्त्यांनी दया—मया आणि माणूसकी दाखविली नाही. इंग्रज, पोर्तुगीज जेथे गेले तेथे वसाहती स्थापन करून लोकांवर अन्याय—अत्याचार करीत होते. इ.स. १८५७ च्या काळात इंग्रजांनी उठावातील नेते, त्याचे सैन्य या सर्वांना मृत्युदंडाची शिक्षा, आजन्म कारावासाची शिक्षा दिल्या होत्या. उठाव करणाऱ्यांना फासावर

चढविले तरी इंग्रज सरकारचे त्यामुळे समाधान झाले नाही. त्यांनी सामान्य लोकांमध्ये दहशत निर्माण व्हावी म्हणून या कैद्यांचा छळ करण्यास सुरूवात केली होती. हया सरकारी दहशतीला क्रांतीकारकांनीही दहशतीतूनच उत्तर दिले होते.

इ.स. १८५७ च्या संघर्षात मराठी जनतेने जरी भाग घेतलेला होता. भारतभूमीला स्वतंत्र करण्यासाठी भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये लोकांनी जो लढा दिला, त्यामागची त्याची तळमळ, स्वधर्म व स्वदेशाविषयीची त्यांची निष्ठा ही निश्चितपणे आजही आदर्श देण्यासारखी आहे. दहशत, भिती, कुटिल राजनीतिमध्ये इंग्रज राज्यकर्त्यांसमोर मराठे पराभूत झाले, हे जरी सत्य असले तरी ज्या प्रेरणा त्या काळात उदयास आल्या त्या प्रेरणा पुढे चिरस्थायी बनत गेल्या. त्या प्रेरणेतून आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती झाली.

ब्रिटिश सत्तेच्या विरोधात जी स्वातंत्र्यचळवळ झालेली होती. त्याच चळवळीचा इतिहास मोठया प्रमाणावर आणि वेगवेगळया विचार प्रवाहातून लिहिले गेलेला आहे. त्यावर जर, आपण नजर टाकली तर आपल्या अशा असे लक्षात येईल की, एका विशिष्ट वर्गाचे प्रतिबिंब आपल्या इतिहासात आधोरेखित केलेले दिसून येते. मग या स्वातंत्र्य चळवळीत फक्त एका विशिष्ट वर्गानेच भाग घेतलेला होता का? तर याचे उत्तर नाही असे आहे. मग ज्या चळवळीत संपूर्ण जनसमुदायाचे भाग घेतलेला होता. त्याची दखल भारतीय इतिहासालेखनाने घेतलेली नाही. म्हणून वंचितांचा किंवा सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह भारतात उदयाला आला. त्यानंतर ज्या ज्या वर्गाने समुहाचे स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेला होता. त्याच्या कार्याची दखल या सबाब्टर्न प्रवाहाने घेतलेली आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रकल्प या अनुषंगाने विचार घेऊन त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. अहमदनगरमधील आदिवासी जमातीने विशेषत: भिल्ल आणि कोळी या दोन आदिवासी जमातीने ब्रिटिशांच्या विरोध आपल्या हक्कासाठी तीव्र लढे दिले त्याची दखल याठिकाणी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या अनुषंगाने या जमातीच्या संघर्षाची माहिती अहमदनगर तसेच

महाराष्ट्रातील सामान्यजनाना व्हावी या हेतूने प्रस्तुत शोध प्रकल्प हाती घेतलेला आहे.

इंग्रजांच्या जुलुमी सत्तेच्या विरोधात लढण्याचे सर्व प्रथम कार्य महाराष्ट्रातील आदिवासी स्वातंत्र्य विरा वीरांनी हाती घेतलेले होते. हे पहिल्यांदा आपणास मान्य करावे लागेल. ज्या ज्या वेळी परकीय आक्रमणे झाली त्या सर्वांना प्रखर विरोध करणारा समाज या मातृभूमीतील आदिवासीच होता. हे आपणास लक्षात घ्यावे लागेल. मात्र त्यांच्या लढयाची, संघर्षाची दखल मात्र इतिहासलेखनाने घेतली नाही. कारण भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आणि इतिहास लेखनात अभिजवादी वर्गाचे वर्चस्व नेहमीच राहिलेले आहे. त्यामुळे वर्ग प्रभुत्वाच्या जाणिवेतून आदिवासींच्या पराक्रमाकडै जाणूनबूजून दुर्लक्ष केले गेले होते. म्हणून आदिवासींच्या पराक्रमाची शौर्याची त्यांच्या मातृभूमीच्या प्रेमातून व स्वत:च्या संस्कृतीच्या संरक्षणासाठी त्यांनी जो संघर्ष केला. तो नविन भारतीय पिढीपुढे ठेवला पाहिजे. त्याशिवाय आदिवासी जमातीला योग्य न्याय मिळणार नाही. ही भूमिका या ठिकाणी महत्वाची मानली गेली पाहिजे. हाच प्रस्तुत संशोधनाचा महत्वाचा हेतू ठरलेला आहे.

अहमदनगरमधील भिल्ल आणि कोळी या दोन आदिवासी जमातीने ब्रिटिशाच्या विरोधी संघर्ष केला. कारण मराठेशाहीत वतनदारी, किल्लेदारी ही या जमातींकडे होती. मात्र इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात स्थापन होताच आदिवासींच्या उपजीविकेचे साधन असणारे वतनदारी आणि किल्लेदारी त्यांच्याकडून काढून घेण्यात आलेली होती. त्यामुळे भिल्ल आणि कोळी आपली उपजीविका भागविण्यासाठी लुटमार आणि चोऱ्या करू लागलेली होती. म्हणून भिल्ल आणि कोळी जमाती आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करू लागलेले होते. आपल्या स्वाभिमानाची अस्मितेची जाणिव झालेल्या भिल्ल आणि कोळी दरोडेखोरी करायला लागल्यामुळे ब्रिटिशांनी या जमातींना बंडखोर म्हणून घोषित केले होते. त्यामुळे या बंडखोर आदिवासींवर ब्रिटिशांनी हल्ले करण्यास सुरूवात केलेली होती. या आदिवासी जमातीवचे उठाव दडपण्याचा प्रयत्न इंग्रजांना चालविलेला होता. त्यातूनच भिल्ल आणि कोळी जमातींचा

स्वाभिमान जागृत होऊन त्यांनी स्वसरंक्षणासाठी ब्रिटिशांच्या विरोधात लढा सुरू केलेला होता.

आदिवासी जमातीवर ब्रिटिशांनी जो अन्याय आणि अत्याचार करण्यास सुरूवात केल्यामुळेच या जमातींनी लुटमार करणे, जाळपोळ करणे, सरकारी खजिना लुटणे यासारख्या पध्दतीनी त्यांनी इंग्रजांच्या विरोधात आपली भूमिका घेतलेली आपणास दिसून येते. ब्रिटिशांनी जंगल अधिकारापासून भिल्लांना वंचित केल्यामुळे त्यांचे जीवन असहाय्य झाले होते. त्यामुळेच त्यांनी ब्रिटिश सत्तेला विरोध करण्यास सुरूवात केलेली होती.

इंग्रजांच्या आथ्रिक धोरणामुळे भारतीय जनतेवर त्यांनी आर्थिकदृष्टया वर्चस्व प्राप्त केलेले होते. शेतीच्या व्यापारी करणामुळे शेतकरी, शेतमजुर यांच्यावर अन्याय, अत्याचार ब्रिटिशांनी केलेले होते. या अत्याचारात विरोध करण्यासाठी भिल्ल, कोळी मजूर या वर्गाने आपआपल्या पध्दतीने विरोध करण्यास सुरूवात केलेली होती. त्यातूनच भिल्ल आणि कोळी जमातींनी इंग्रजांच्या ब्रिटिशांच्या ठाण्यावर हल्ले करून त्यांना हैराण करून सोडलेले होते.

अहमदनगर जिल्हयातील अकोले, राहुरी, पारनेर, कोपरगांव, नेवासा या भागातील आदिवासी संघटित होऊन त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात उठाव करण्यास सुरूवात केली होती. परंतु ब्रिटिशांनी या जमातीमध्ये फुट पाडलेली आपणास दिसून येते. त्यामुळे लहान मोठया चोऱ्या करणे, दरोडे घालणे यासारखे उद्योग या जमातींनी केलेले दिसून येतात. केवळ स्वत:च्या उपजीविकेसाठी त्यांनी हा मार्ग स्वीकारलेला आपणास दिसून येतो. एवढेच नव्हे तर इ.स. १८५७ मध्ये इंग्रजांनी भिल्ल जमातींला गुन्हेगार ठरवून त्यांच्यावर खटले भरलेले आपणास तत्कालीन कागदपत्रकावरून दिसून येते. आजही आपल्याला स्वातंत्र्य मिळवून जवळजवळ सत्तर वर्ष उलटून गेले पण आदिवासंच्या जीवनात फार फरक पडलेला आपणास दिसून येत नाही.

ब्रिटिश सत्तेच्या काळात आदिवासी जमातींना समाजापासून दुर ठेवण्याच्या प्रयत्न इंग्रजांनी जाणिवपूर्वक केलेला आपणास दिसून येतो. एवढेच नव्हेतर आदिवासींच्या परिस्थितीचा फायदा घेऊन ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्यांना

ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास प्रयत्न केलेला आणास दिसून येतो. आदिवासी लोकांना धर्मांतरीत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

इ.स. १८२५ मध्ये ब्रिटिशांनी आदिवासी भिल्लाबाबत आपली नीती बदलेली दिसून येते. त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यामुळे काही काळ का होईना आदिवासी जमाती शांत झाल्या होत्या. ब्रिटिशांनी सावकरांना मदत केली म्हणून भिल्लांनी उठाव केले होते. आदिवासी भिल्ल व कोळी जमातीने त्यांच्यावर लादलेल्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी आपले स्वत्व जागृत करण्यासाठी व्यापक व जबरदस्त हादरा आदिवासी जमातींनी ब्रिटिश सत्तेला दिलेला होता.

ब्रिटिशांच्या शस्त्रबंदीच्या हुकुमाला बेरड, कोळी, भिल्ल या आदिवासींनी अजिबात प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे भिल्लांनी ब्रिटिशांच्या विरोधात असहकार पुकारलेला आपणास दिसून येतो. त्यातूनच भिल्लांनी अकोले आणि सिन्नर भागात भागोजी नायकाने राहुरी, पारनेर भागात तर पार्थजी नायकाने पुन्हा बंड करण्यास सुरूवात केलेली दिसून येते. दरम्यान भिल्ल आणि कोळी जमातीने दऱ्याखोऱ्यात आश्रय घेऊन इंग्रजांना बेजार केलेले होते. हे त्याच्या एकंदर हालचालीवरून दिसून येते. इ.स. १८५७ च्या उठावात भाग घेण्याचा प्रत्येक आदिवासी जमातीचा हेतू जरी वेगवेगळा असला तरी त्यांचा शत्रू मात्र आदिवासी जमातीत एकमत असल्याचे आपणास दिसून येते.

भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी आपल्यापणांची आहुतीन दिली. त्या क्रांतिकारकात आदिवासी भिल्ल, रामोशी, कोळी यांचे विशेष अशा स्वरूपाचे योगदान राहिलेले आहे. परंतु आदिवासी देशभक्तांचे एक दुदैव असे की, त्यांनी स्वातंत्र्य लढयासाठी केलेले योगदान जनतेसमोर आले नाही. त्यांच्या आडणीपणात कसले देश प्रेम आणि कसला स्वाभिमान असा मानणार अभिजन वर्ग याठिकाणी होता पण या अडाणीपणात देखील आपल्याला देशप्रेम, देशभावना, स्वाभिमान असल्याची जाणिव झाल्याशिवाय राहत नाही. राष्ट्रीय चळवळीत ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी भाग घेतला त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांना दरमहा मानधन देण्यात येऊ लागले. पण आदिवासी भिल्ल,

कोळी यान १९ व्या शतकाच्या पूर्वाधात जे लढे दिले. त्यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून मात्र सन्मान मिळाला नाही हे सत्य आपणास मान्य करावे लागले.

# संदर्भ सूची


## प्राथमिक साधने

१) अप्रकाशित साधने

१) मुंबई अभिलेखागार कागदपत्र– १८५७ च्या उठावाच्या संदर्भातील कागदपत्रे

२) काळे मोहनीराज १८५७ चा भारतीय स्वातंत्र्य संग्राम

३) पुणे अभिलेखागार कागदपत्र

२) प्रकाशित साधने

१) कानिटकर वि.ग. – १८८७ चे स्वातंत्र्य युध्द : पेटलेला दक्षिण हिंदुस्थान, टिळक स्मारक, पुणे २

२) कुलकर्णी ल.का. – अहमदनगर डिस्ट्रिक्ट डिरेक्टरी, अहमदनगर १ मे १९५१

३) कुंटे भ.ग. – अहमदनगरची निजामशाही, मुरली प्रकाशन प्रथमावृत्ती १९६२

४) कैलाश शंकर – १८५७ के स्वाधीनता संग्राम मे दक्षिण भारत का योगदान, भारतीय इतिहास संकलन समिती, आग्रा, २००१.

५) जोशी ल.गा. – मराठी विश्वकोश महाराष्ट्र राज्य साहित्य निर्मिती, १९७६ मुंबई.

६) जोशी ल.गा. – खंड १२, १९८५, मुंबई

७) जोशी ल.गा. – खंड ६ वा भारतीय संस्कृती कोष निर्मिती १९७५ पुणे.

८) निसळ सदाशिव शिवराम, दिवाण पळशीकर दप्तर खंड १

अहमदनगर ऐतिहासिक संग्राहलय १९९२

९) पाठक ना.वि. — अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य संग्राम १
अहमदनगर ऐतिहासिक संग्रहालय अहमदनगर

१०) महाराष्ट्र सरकार, अहमदनगर गॅझेटिअर्स, महाराष्ट्र सरकार
गॅझेटिअर्स निर्मिती, सचिव, मुंबई १८७६.

११) महाराष्ट्र सरकार, अहमदनगर गॅझेटिअर्स, महाराष्ट्र सरकार
गॅझेटिअर्स निर्मिती, सचिव, मुंबई १८८४ खंड १७

१२) महाराष्ट्र सरकार नाशिक गॅझेटिअर्स, महाराष्ट्र सरकार
गॅझेटिअर्स निर्मिती, सचिव, मुंबई १८७५

१३) महाराष्ट्र सरकार, मुंबई गॅझेटिअर्स, १९८५

१४) मुंबई अभिलेखागार, पॉलिटिकल डिपार्टमेंट खंड १८८४, खंड २१,
१८५७ खंड ३१, खंड १८५८ खंड २०,२५,२८,३०,३३,३५

१५) टेलर सी.ई.टी. अहमदनगर मॅजिस्ट्रेट जून १८५८ मुंबई, पी.डी.खंड
३०, १८५८

**इंग्रजी**

1) Boswell's S.B. Report to I.R. Margen competh, Jan 1858.
2) Enthoven R.E. The Tribes and Castes of Bombay Cosmo Publication, Delhi, 1975 Re-print.
3) Government of India, Source Material For History of Freedom movement in India.
4) Government of Bombay – Source Material for History of Freedom movement in India, Vol – 1, 1818 – 1885, Bombay. Government Record.
5) Government of Bombay – 1858 History of Freedom Vol.-36, Bombay, Government Record.
6) Government of Bombay – Presidency vol-21, Part 1 Government Record.
7) Nagarkar D.D. – Gilmpses of Ahmednagar, Ahmednagar 1977

**२) दुय्यम साधने**

१)कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवास, डायमंड —पुर्नमुद्रण २०११

२)केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, मनोरमा प्रकाशन, मुंबई १९८५.

३)खोबरेकर वि.गो., ३ इंग्रजी सत्तेविरूध्दचे महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७०

४) गारे गोविंद, सातपुडयातील भिल्ल, ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ऑक्टो, १९९५.
५) गारे गोविंद, भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, मार्च १९९३.
६) गारे गोविंद, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगाव प्रकाशन, पुणे दुसरी आवृत्ती मार्च २०१३.
७) गारे गोविंद, आदिवासी प्रश्न, आदिम प्रकाशन, पुणे १९७५.
८) घाटपांडे दि. ब, १८५७ चे स्वातंत्र्योत्तर, दक्षिण भारताचे योगदान, औरंगाबाद, इतिहास संकलन समिती, पुणे फेब्रु. २००८.
९) भांड बाबा, एक जननायकाच्या शोधाची कहाणी, संकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती २००२.
१०) मिरीकर ना.य., नगर शहराचा इतिहास, अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, अहमदनगर १९६८.
११) दास शिवतोष, स्वतंत्रता सेनानी वीर आदिवासी, किताबंर घर, नवी दिल्ली, मार्च १९९३.

विशेषांक

१) गावित पुष्पा, नादहारकंद, होळी, विशेषांक, आदिवासी बोली भाषा, मुंबई १९९७.
२) निसाळ श्री.वि., अहमदनगर नगरपालिका शतसांवत्सीरका स्मारक ग्रंथ, अहमदनगर नगरपालिका, अहमदनगर १९५४.
३) निसळ श्री.वि., आदिरंग, दिवाळी अंक, शुर ॲम, मर्द, ॲम् अर्थात खानदेशातील अज्ञान आदिवासी वीर पुरूष, नंदूरबार, १९९९.
४) वळवी विश्राम, दैनिक लोकमत, नगर पंच शताब्दी विशेषांक लोकमत प्रकाशन, १९९०.
५) झळके रा., सिन्नर वर्धापन दिन विशेषांक, दैनिक लोकमत २००६.

स्मरणिका

१) ८ वे आखिल भारतीय आदिवासी साहित्य संमलेन, नाशिक दि. २१ व २२ फेब्रु, २००९.

वृत्तपत्र

१) ज्ञानोदय

२) दैनिक लोकमत ( सिन्नर )

३) केसरी ( पुणे )

४) लोकमत ( नाशिक )

५) सकाळ ( नाशिक )

६) लोकमत ( अहमदनगर )